# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— ९/१/२००९

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ९/१/२००९ रोजीच्या
विशेष महासभेचे इतिवृत्त.

वि—८

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा शुक्रवार दिनांक ९/१/२००९ रोजी सायंकाळी ४.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती विद्याताई निर्मले हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. महापौर—— श्रीमती निर्मले विद्या विजय

२. उप—महापौर—— श्री. आयलानी कुमार उत्तमचंद

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३४ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३५ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३६ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ३७ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ३८ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ८ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ३९ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४० | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| १० | श्री. मोरे भानजी भिकारी | ४१ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ११ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४२ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| १२ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ४३ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १३ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४४ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १४ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४५ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १५ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४६ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १६ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४७ | श्री. किशोर जग्यासी |
| १७ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ४८ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १८ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ४९ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १९ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५० | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २० | श्री. राजू जग्यासी | ५१ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २१ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५२ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २२ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५३ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २३ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ५४ | श्री. मोहन साधवाणी |
| २४ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५५ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २५ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम | ५६ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २६ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ५७ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २७ | श्री. लाल पंजाबी | ५८ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २८ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ५९ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| २९ | श्रीमती शकुंतला पाटील | ६० | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३० | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६१ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३१ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६२ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३२ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ६३ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |
| ३३ | श्री.एडके गणपत गोविंद | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान, २. श्री. राम (चार्ली) पारवानी, ३. श्री. भठीजा (बब्बु) संजय, ४. श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे, ५. श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती, ६. श्री. मोहन (गारो) रामरख्यानी, ७. श्रीमती

करोतीया मालती राधाचरण, ८. श्री. मंगतानी सुंदर आसनदास, ९. श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे, १०. श्री. शेखर केशव यादव, ११. श्री. रमेश महादेव चव्हाण, १२. श्रीमती मनसुलकर शिला सुभाष, १३. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, १४. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), १५. श्री. मुकेश सोहन तेजी, १६. श्री. पाटील प्रधान धर्मा, १७. श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी, १८. श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त
२. श्री. मिलींद सावंत, उप–आयुक्त
३. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
४. श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
५. डॉ. जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
६. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी
८. श्री. अनंत कांबळे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
९. श्री. एस.जी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१०.श्री. आर.बी.शिर्के, प्र. शहर अभियंता
११.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
१२.श्री. चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१३.श्री. व्ही.आर.गर्जे, प्र. प्रभाग अधिकारी
१४.श्री. खवणेकर, विशेष कार्य अधिकारी
१५.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी तथा प्र. प्रभाग अधिकारी
१६.श्री. उदय लिमये, मुख्य लिपिक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीमती नर्गिस खान

सांयकाळी ५.०० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

महापालिका सचिव :– विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १ :– . पुर्वीचा महासभा ठराव क्र. ४२, दिनांक २/१२/२००८ मध्ये सुधारणा करणे.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :–मा. महापौरजी, मागील महासभेत आपण जो ठराव पारीत केला होता, त्यात फेरबदल करायचा आहे. आपण जी दंडात्मक आकारणी केली होती ती प्रचलित बाजारभाव तक्त्या (रेडी रेकनर) नुसार आकारण्यात यावी. आणि बाल्कनीचा जो दंड आकारला होता तो ४,००० रुपये आकारण्यात यावा. यापुर्वीच्या ठरावात तो साडेसात हजार रुपये लावला होता तो चार हजार लावण्यात यावा. आणि बाजारभाव तक्त्यानुसारचे (रेडी रेकनर नुसारचे)जे दर आहेत ते दंडात्मक कारवाईसाठी लावावेंत. मा. आयुक्त साहेब, मा. सचिव साहेब, प्रशासनाने जो प्रस्ताव पाठविला होता, त्याच प्रस्तावास मान्यता दयायची आहे. याबाबतचा लेखी प्रस्ताव मी मा. महापौर महोदयांना सादर करतो.

सदस्य श्री. राजेश वदारिया :–मा. महापौरजी, मी नगररचनाकारांना एक प्रश्न विचारु इच्छितो, आपणाकडे इमारती नियमाधिन करण्याबाबतचे जे प्रस्ताव सादर होत आहेत त्यांना कोणते दर आकारले जातील, किंवा हे दर त्यांना लागु राहणार नाहीत का?

**श्री. अ.पा. गुरगुळे (नगररचनाकार):–** मा. महापौर, मा. उप–महापौर, मा. आयुक्त, मा. सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे की, अनाधिकृत बांधकामे नियमाधिन करण्यासाठी आपणाकडे जे प्रस्ताव सादर झाले आहेत त्यांना हे दर लागु होतील किंवा कसे? अनाधिकृत बांधकामे नियमाधिन करणे हा विषय शासनाच्या अधिकारातील आहे. त्यामुळे याबाबत आपणांस शासनाकडे पाठपुरावा करावा लागेल. आणि शासन जो निर्णय देईल त्याप्रमाणे ते दर लागु होतील. याबाबत येथे आपण निर्णय घेणे योग्य राहणार नाही. कारण याबाबतचा जो अध्यादेश आहे तो शासनाने जाहिर केलेला आहे, दर सुध्दा शासनाने निश्चित केले आहेत. अधिमुल्य दराबाबत आपण हा जो ठराव पारीत करत आहोत, हे दर फक्त नविन इमारतींसाठी लागु होतील. कारण की, शासनाने जो अध्यादेश काढलेला आहे, त्यानुसार याबाबतचा आपणांस शासनाकडे प्रस्ताव पाठवावा लागेल. शासन जो प्रस्ताव पारीत करील तो त्यास लागु होईल. आताचा जो प्रस्ताव आहे तो फक्त नविन इमारतींच्या दृष्टीकोनातुन आहे.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :–**मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मागील महासभेत ठरावान्वये जे दर निश्चित केले होते ते रद्द करुन प्रशासनाने जो प्रस्ताव पाठविला होता त्यास मान्यता दयावी.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–**मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, आम्ही कोणत्या प्रकारचा ठराव पारीत करत आहोत तो जरा वाचुन दाखवा. नाहीतर पुन्हा एखादा ठराव आणावा लागेल असे होवू नये.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:–**मा. महापौरजी, माझ्या मते हा मुद्दा अदयाप स्पष्ट झाला नाही की, ज्या कोणत्याही इमारतीचे बांधकाम केले जाईल तिचे चटई क्षेत्र बांधकाम नियंत्रण नियमावलीनुसार मोजले जाईल? व त्यांच्यासाठी चटईक्षेत्र निर्देशांक ४ देण्यात येणार आहे. तर जेव्हापासुन त्यांचा एफएसआय गणला जाईल त्यावेळेपासुन जिना बांधकामाचे क्षेत्र वगळले जाईल की, त्याचे बांधकाम चटईक्षेत्रामध्ये मोजले जाईल? जर जिन्याचे बांधकाम चटई क्षेत्रापासुन अलिप्त ठेवण्यात आले असेल तर त्यास अधिमुल्य आकारले जाणार नाही काय, किंवा जसे शासनाने मुद्दा क्र. १ मध्ये दर्शविलेल्याप्रमाणे १० टक्के रेडीरेकनर प्रमाणे? रेडीरेकनर कोठे आहे? याबाबत स्पष्टीकरण होणे अतिशय महत्वाचे आहे.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :–**मा. महापौरजी, हा विषय बांधकामे नियमाधिन करण्याबाबतचा नसून नविन इमारतींना सुविधा पुरविण्याबाबतचा आहे. बांधकामे नियमाधिन करण्याचा विषय हा शासनाचा आहे. त्यावर शासन निर्णय घेईल. मागील महासभेत प्रशासनाने जो प्रस्ताव पाठविला होता तो मान्य केला जावा. आम्ही जे दर वाढविले होते ते रद्द केले जावेत.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**चार निर्देशांक (एफएसआय) कसा मोजला जाईल?

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–**आम्ही कशाप्रकारे ठराव पारीत करत आहोत तो वाचुन दाखविला जावा.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :–**सुरक्षा अनामत रक्कम जी यापुर्वी दहा हजार रुपये ठेवण्यात आली होती, ती प्रति चौरस मिटर पाच हजार करण्यात यावी.व रहिवासी प्रयोजनासाठी मागितली जाणारी सवलत रेडीरेकनर प्रमाणे १०० टक्के, वाणिज्य वापरासाठी २०० टक्के, रहिवास व वाणिज्य बाल्कनी बंदिस्त करण्यासाठी प्रति बाल्कनी ४००० रुपये या बाबत प्रशासनाने यापुर्वी पाठविलेला जो प्रस्ताव आहे तो आम्ही मान्य करतो.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**या प्रस्तावास आमचे समर्थन आहे, परंतु आमच्या प्रश्नांची उत्तरे मिळाली पाहिजेत.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–**बांधकाम नकाशा मंजुर केल्यानंतर किती दिवसामध्ये बांधकाम पुर्णत्वाचा दाखला देणे बंधनकारक असते ते जरा सांगितले जावे.

**श्री. अ.पा. गुरगुळे (नगररचनाकार):–** इमारतीचे बांधकाम पुर्ण करण्यासाठी जास्तीत जास्त कालावधी चार वर्षाचा असतो. त्यासही मुदतवाढ मिळु शकते.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>आजपासुन चारवर्ष अगोदर ज्या कुणी बांधकाम परवानगी मंजुरीसाठी अर्ज सादर केला आहे त्याने बांधकाम पुर्ण केले नाही, बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेतलेला नाही, त्यासही याचा फायदा मिळाला पाहिजे.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :—</u>मिळेल, मिळेल.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>नियमानुसार. मिळेल ना? महासभा ठराव पारीत करत आहे तर मग त्यांना फायदा मिळेल किंवा नाही ते सांगितले जावे.

<u>श्री. अ.पा. गुरगुळे (नगररचनाकार):—</u> हे पहा, हा धोरणात्मक निर्णय आहे, तो आम्ही शासनाकडे मंजुरीस पाठवु आणि त्याचा पाठपुरावा करु.

मा सदस्य श्री. जीवन इदनानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>नगररचनाकार साहेब, सामासिक अंतरामध्ये शिथीलता ही अगदी ज्याठिकाणी आवश्यकता आहे, त्याचठिकाणी देण्यात यावी. सर्वत्र शिथीलता देण्यात येवु नये. तसे केले तर इमारती एकमेकींना खेटुन उभ्या राहतील आणि पुन्हा पहिल्यासारखी परीस्थिती निर्माण होईल. आणि म्हणुन जेथे अत्यंत आवश्यकता आहे तेथेच सामासिक अंतरामध्ये शिथीलता दया. सामासिक अंतरामध्ये शिथीलता देण्याचे सर्रासपणे सुरु केले तर उल्हासनगर कॅम्प नं. २ सारखी स्थिती होईल.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. १** :—पुर्वीचा महासभा ठराव क्र. ४२, दिनांक २/१२/२००८ मध्ये सुधारणा करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या विशेष महासभेने दिनांक २/१२/२००८ रोजी ठराव क्र. ४२ पारीत केल्यानंतर त्या अनुषंगाने उल्हासनगर शहराशेजारी असलेल्या काही महानगरपालिकांकडे चौकशी केल्यानंतर असे आढळुन आले की, रहिवासी प्रयोजनार्थ रुपये, ७,५००/— प्रती चौरस मिटर तसेच वाणिज्य प्रयोजनार्थ आकारावयाची रक्कम रहिवासी प्रयोजनार्थीचे दुप्पट अधिमुल्य आकारणी व बाल्कनी बंद करण्यासाठी दंडाची रक्कम रुपये ७,५००/— प्रति बाल्कनी ही रक्कम ब व क संवर्गीय महापालिकांमध्ये प्रचलित असलेल्या दरांपेक्षा जास्त आहे. तसेच उल्हासनगर कॅम्प नं. १ ते ५ मध्ये २० चौरस मिटर प्रमाणे किमान रुपये १०,०००/— प्रत्येक प्रकरणात प्रतिपुर्ती ठेव म्हणुन आकारण्याचा घेण्यात आलेला निर्णय बरोबर दिसुन येत नाही. यामुळे दिनांक २/१२/००८ रोजीच्या महासभा ठराव क्र. ४२ मध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | तपशिल | आकारावयाचे मुल्य |
|---|---|---|
| १. | रहिवास प्रयोजनार्थ मागितली जाणारी सवलत | १०० टक्के<br>शासनाच्या मुद्रांक विभागाने वेळोवेळी जमिनीचे ठरविलेले प्रचलित बाजार दर |
| २. | वाणिज्य प्रयोजनार्थ मागितली जाणारी सवलत | २०० टक्के<br>शासनाच्या मुद्रांक विभागाने वेळोवेळी जमिनीचे ठरविलेले प्रचलित बाजार दर |
| ३. | बांधकाम परवानगी<br>प्रत्येक परवानगी धारकाने मंजुर नकाशात देण्यात आलेल्या निर्देश व अटी, शर्तीचे अनुपालनाचे सुनिश्चितीसाठी प्रतिपुर्ती ठेव आकारणी | रुपये १०/— प्रति चौरस मिटरप्रमाणे किमान रुपये ५,०००/— प्रत्येक प्रकरणात |

| | | |
|---|---|---|
| ४. | बाल्कनी<br>बाल्कनी बंद करण्याचे दंडाची रक्कम | रुपये ४,०००/—<br>प्रति बाल्कनी |

वरील सर्व दर प्रशासनाने पुर्वी प्रस्तृत केलेल्या गोषवा—यात सुचविले असून किरकोळ फेरफारासह लागु करण्यास व पुर्वीच्या महासभा ठराव क्र. ४२ मध्ये बदल करण्यास प्रस्तावित.

विशेष महासभा ठराव क्र. ४७ दिनांक :—९/१/२००९

**सुचकाचे नाव** :— श्री. विनोद लालसिंग ठाकुर

**अनुमोदकाचे नाव** :— श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री)

ही विशेष महासभा वरील प्रस्तावनेनुसार दिनांक २/१२/२००८ रोजीच्या महासभा ठराव क्र. ४२ मध्ये परंतुक वगळुन खालीलप्रमाणे बदल करण्यास मान्यता देत आहे. व हे बदल पुर्वीच्या महासभा ठरावात अंतर्भुत झाल्याचे मानण्यात येईल.

| अ.क्र. | तपशिल | आकारावयाचे मुल्य |
|---|---|---|
| १. | रहिवास प्रयोजनार्थ मागितली जाणारी सवलत | १०० टक्के<br>शासनाच्या मुद्रांक विभागाने वेळोवेळी जमिनीचे ठरविलेले प्रचलित बाजार दर |
| २. | वाणिज्य प्रयोजनार्थ मागितली जाणारी सवलत | २०० टक्के<br>शासनाच्या मुद्रांक विभागाने वेळोवेळी जमिनीचे ठरविलेले प्रचलित बाजार दर |
| ३. | बांधकाम परवानगी<br>प्रत्येक परवानगी धारकाने मंजुर नकाशात देण्यात आलेल्या निर्देश व अटी, शर्तीचे अनुपालनाचे सुनिश्चितीसाठी प्रतिपुर्ती ठेव आकारणी | रुपये १०/— प्रति चौरस मिटरप्रमाणे किमान रुपये ५,०००/— प्रत्येक प्रकरणात |
| ४. | बाल्कनी<br>बाल्कनी बंद करण्याचे दंडाची रक्कम | रुपये ४,०००/—<br>प्रति बाल्कनी |

सदर ठरावाअंतर्गतचा निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकांची सही/—

अनुमोदकांची सही/—

सर्वानुमते

महापौर/पीठासीन अधिकारी

विशेष महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ५.४५ वाजता महापौर श्रीमती विद्याताई विजय निर्मले यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— १३/११/००९

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १३/११/२००९ रोजीच्या
विशेष महासभेचे इतिवृत्त.

वि—९

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा शुक्रवार दिनांक १३/११/२००९ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती विद्याताई निर्मले हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

३. महापौर —— श्रीमती निर्मले विद्या विजय

४. उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ४१ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ४२ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ५ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ४३ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ६ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४४ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ७ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४५ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ८ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४६ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ९ | श्री. मोरे भानजी भिकारी | ४७ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १० | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ४८ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ११ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४९ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १२ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ५० | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १३ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ५१ | श्री. शेखर केशव यादव |
| १४ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ५२ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १५ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५३ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १६ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५४ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १७ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५५ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १८ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५६ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १९ | श्री. राजू जग्यासी | ५७ | श्री. किशोर जग्यासी |
| २० | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५८ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| २१ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५९ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २२ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ६० | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २३ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ६१ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २४ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ६२ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २५ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम | ६३ | श्री. मोहन साधवाणी |
| २६ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ६४ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २७ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ६५ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २८ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६६ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २९ | श्री. लाल पंजाबी | ६७ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| ३० | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६८ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३१ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६९ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| ३२ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ७० | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३३ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ७१ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३४ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ७२ | श्री. पाटील प्रधान धर्मा |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ७३ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३६ | श्री.एडके गणपत गोविंद | ७४ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३७ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ७५ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ३८ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ७६ | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी |
| ३९ | श्रीमती महाडीक रजनी मोहन | ७७ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |
| ४० | श्री. कुमार उत्तमचंद आयलानी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्री. गायकवाड दिलीप, २. श्री. दत्तात्रय नारायण पवार, ३. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, ४. श्रीमती शकुंतला पाटील

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोक बागेश्वर, आयुक्त
२. श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त
३. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
४. श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
५. श्रीम. संगिता धायगुडे, उप–आयुक्त
६. श्री. च.प्र.सिंह, सहा. संचालक नगररचना
७. श्री. विजयकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
८. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा परिक्षक
९. श्री. जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
१०. श्री. माधव जवादे, शहर अभियंता
११. श्री. एस.जी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१२. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
१३. श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य
१४. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
१५. श्री. रमेश काजळे, प्र. प्रभाग अधिकारी
१६. श्री. चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१७. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१८. श्री. नंदु समतानी, प्र. प्रभाग अधिकारी
१९. श्री. अश्विनी अहूजा, कार्यकारी कनिष्ठ अभियंता, मालमत्ता
२०. श्री. खामितकर, कनिष्ठ अभियंता, मालमत्ता
२१. श्री. उदय लिमये, मुख्य लिपिक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. तानाजी पतंगराव
२. श्रीमती अमिता संखे
३ श्रीमती नर्गिस खान

दुपारी ३.३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u> सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य, उल्हासनगर शहरामध्ये सन्मुख सदन नावाची जी इमारत कोसळली त्यामध्ये जी जिवित हानी झाली. ज्या व्यक्ती मृत पावल्या त्यांना कृपया आपण श्रध्दांजली वाहू या.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>त्याचबरोबर शिवसेनेचे नगरसेवक, माजी विरोधी पक्ष नेते व शिवसेनेचे गटनेते श्री. दिलीप गायकवाड यांचे बंधू श्री. प्रभाकर दशरथ गायकवाड यांचेही आज निधन झाले आहे. त्यांना सुध्दा आपण श्रध्दांजली अर्पित करु या.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**मा. महापौर महोदया, विदयुत विभागाचे कर्मचारी श्री. भिमा ससाणे यांचेही नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे, त्यांना सुध्दा श्रध्दांजली अर्पित केली जावी.

**<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>**मा. महापौर महोदया, आपल्या शहरातील जेष्ठ नागरीक व थोर स्वातंत्र सेनानी श्री. सुंदरदास बठिजा यांचेही नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे. त्यांनाही श्रध्दांजली वाहिली जावी.

---

सुचकाचे नाव :– श्री.बी.बी. मोरे
श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे
श्री. मोहन साधवानी

<u>शोक प्रस्ताव</u>

उल्हासनगर शहरातील गुडमॅन कॉटेज व सन्मुख सदन या इमारती कोसळून त्यात काही नागरीक मृत्युमुखी पडले . तसेच उल्हासनगर महानगरपालिकेतील माजी विरोधीपक्ष नेता, शिवसेना गटनेता व शिवसेनेचे विद्यमान सदस्य, श्री. दिलीप गायकवाड यांचे बंधू श्री. प्रभाकर दशरथ गायकवाड यांचे आज दिनांक १३/११/२००९ रोजी निधन झाले आहे.

तसेच महापालिकेच्या विदयुत विभागातील कर्मचारी श्री. भिमा ससाणे, जेष्ठ नागरीक व थोर स्वातंत्र सेनानी श्री सुंदरदास बठिजा यांचे सुध्दा नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे.

वर उल्लेखिलेल्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ४२ अ</u> <u>दिनांक:–१३/११/२००९</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार गुडमॅन कॉटेज व सन्मुख सदन या इमारती कोसळून मृत्युमुखी पडलेल्या नागरीकांना तसेच, श्री.प्रभाकर गायकवाड, श्री. भिमा ससाणे व श्री. सुंदरदास बठिजा यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**मा. महापौरजी, या सभागृहाचे सदस्य असलेले आदरणीय श्री. कुमार आयलानीजी, जे उल्हासनगर विधानसभा क्षेत्रातुन आमदार म्हणुन निवडुन आले आहेत आपण सर्वजण त्यांचे हार्दिक स्वागत करु या.

**<u>महापालिका सचिव :–</u>**हार्दिक, हार्दिक, हार्दिक स्वागत. श्री. कुमार आयलानीजी, कृपया व्यासपीठावर या. मा. महापौर हया आपले स्वागत करु इच्छितात.

यावेळी मा. महापौर श्रीमती विद्याताई विजय निर्मले यांनी श्री. कुमार आयलानी यांना पृष्पगुच्छ व शाल, श्रीफळ देवुन अभिनंदन केले.

**<u>सदस्य श्री. कुमार आयलानी :–</u>**मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, सर्व नगरसेवक बंधु व भगिनीहो, सर्व अधिकारी, महापालिका कर्मचारी, आज मी आपल्या आर्शिवादाने आमदार बनुन सभागृहात या व्यासपीठावर उभा आहे. आपल्या सहकार्याने आज मी आमदार बनलो आहे. भारतीय जनता पार्टी, शिवसेना,

गंगाजल फ्रंट, कॉग्रेस, आरपीआय, राष्ट्रवादी कॉग्रेस, मनसे या सर्व पक्षांचे मी आभार मानतो. विशेष म्हणजे महापालिकेतील सर्व अधिकारी, कर्मचारी सर्वांचे मी आभार मानतो. येणा–या परिस्थितीत मला आपला सहकार्य आवश्यक मिळत राहो. जेव्हा केव्हा आपणांस माझ्या सहाकार्याची आवश्यकता असेल त्यावेळी मी सहकार्य देण्यास तयार आहे. जय हिंद, जय महाराष्ट्र, जय झुलेलाल।

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–विधानसभा निवडणूका काळात आपल्या महानगरपालिकेत काही अधिकारी प्रतिनियुक्तीवर आले आहे. त्यांची आपण सभागृहास ओळख करुन देत नाहीत. सर्वात प्रथम आपण सभागृहास त्यांची ओळख करुन दिली पाहिजे. आणि त्यानंतरच सभेचे कामकाज चालु करावे.

महापालिका सचिव :–सर्वात प्रथम श्री. जैन, मुख्य लेखा अधिकारी यांनी व्यासपीठावर यावे व सभागृहास आपली ओळख करुन दयावी.

श्री. प्रविणकुमार जैन (मुख्य लेखा अधिकारी):–मा. महापौरजी, उप–महापौरजी व आयुक्त साहेब, मी प्रविणकुमार जैन आपल्या महानगरपालिकेत मुख्य लेखा अधिकारी म्हणुन २९ ऑगस्ट, २००९ ला पदभार स्विकारलेला आहे. त्यापुर्वी मी मुंबई कोषागारात कार्यरत होतो. गेली १२ वर्ष मी या सेवेत कार्यरत आहे.

महापालिका सचिव :–उप–आयुक्त, श्रीमती संगिता धायगुडे यांनी व्यासपीठावर यावे व सभागृहास आपली ओळख करुन दयावी.

श्रीमती संगिता धायगुडे (उप–आयुक्त):–मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय नगरसेवक, आमदार साहेब व सर्व अधिकारी वर्ग, मी संगिता उत्तम धायगुडे, उप–आयुक्त, आरोग्य म्हणुन हजर झाले आहे. मी मुख्याधिकारी संवर्गातील आहे. आणि मी यापुर्वी खेड नगरपरिषदेत मुख्याधिकारी म्हणुन कार्यरत होते. धन्यवाद।

महापालिका सचिव :– विषय क्र. १ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १ :–** बी.एस.यु.पी प्रकल्पाअंतर्गत राहुलनगर येथिल लाभार्थ्यांसाठी सर्व्हे क्र. ७०५ व खुनी खड्डा (आरक्षित भुखंड क्र. ५) येथिल मोकळया जागेत तसेच वाल्मिकी वसाहत येथिल कर्मचा-यांसाठी उल्हासनगर-५ भुखंड क्र. १०३, शीट क्र. ५४ येथिल मोकळया जागेत तात्पुरते ट्रांझिट कॅम्प उभारणेस मान्यता देणे.

---

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, मी १०३ क्रमांकाच्या भुखंडाबाबत बोलत आहे. हा भुखंड शाळेसाठी आरक्षित असतांना या भुखंडाचा वापर लोकांना तात्पुरत्या स्वरुपात घरे देण्यासाठी करणार आहात तर काय यासाठी आपण आरक्षणामध्ये बदल केला आहे का? आणि केला नसेल तर अशी मान्यता देता येते का?

श्री. सी.पी. सिंग (सहा. संचालक नगररचना):–मा. पीठासीन अधिकारी, सन्माननिय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे, या विषयासंदर्भात प्रशासनाकडुन जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे की, ही जागा आरक्षणामध्ये असल्यामुळे तेथे कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही. तथापी ट्रांझिट कॅम्प आपण तात्पुरता आणि पत्र्याच्या स्वरुपाचा बांधणार असल्यामुळे महासभेने याला मान्यता दयावी.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–तात्पुरता ट्रांझिट कॅम्प आपणांस करावयाचा आहे, त्यासाठी आपण कुठल्याही एखादया ठरावानुसार आपण असे करु शकता का? आणि तात्पुरता म्हणजे नेमके किती दिवसासाठी?

श्री. सी.पी. सिंग (सहा. संचालक नगररचना):–सहा महिन्यासाठी.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :– सहा महिन्यामध्ये ती जागा खाली केली जाईल का? ज्या इमारती कोसळल्या आहेत, त्यातील बेघर लोकांसाठी ट्राझिंट कॅम्प तयार केला, उदया आणखी काही इमारती

कोसळल्या आणि बेघर झालेल्या लोकांना तेथे तात्पुरत्या निवासासाठी जागा देण्यात आली आणि अशा प्रकारे जर पुढे चालत राहिले तर तो ट्रांझिट कॅम्प तात्पुरता कसा झाला?

श्री. सी.पी. सिंग (सहा. संचालक नगररचना):—कमीत कमी सहा महिन्यासाठी जागा देता येवु शकते. आणि त्यानंतर त्यास पुन्हा सहा महिन्यासाठी मुदतवाढ देता येवु शकते.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— अशी काही तरतुद आहे का? कोणत्या अधिनियमाच्या कोणत्या कलमानुसार अशा प्रकारची परवानगी देता येवु शकते ते आपण सांगा.

श्री. सी.पी. सिंग (सहा. संचालक नगररचना):—आपल्या बांधकाम नियंत्रण नियमावलीमध्ये याबाबतची तरतुद आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— कोणत्या अधिनियमामध्ये तरतुद आहे ते सांगा आणि अशी जर तरतुद असेल तर दुस—या लोकांना आपण ही सुविधा का देत नाही? शाळेसाठी आरक्षित जागा आहे. त्याठिकाणी आपण का परवानगी देत नाहीत? माझ्याकडे सनद आहे. मला परवानगी दया?

श्री. सी.पी. सिंग (सहा. संचालक नगररचना):—महानगरपालिकेला त्याची.......................

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— महानगरपालिकेसाठी काय वेगळा कायदा आहे? महानगरपालिका एमआरटीपी ॲक्टच्या अंतर्गत येत नाही का? तिला काही नियम लागत नाही काय? तिला आणखी दुस—या कुठल्या कायदे आणि नियमांची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता भासत नाही काय? मनाला येईल तेथे वाटेल तेथे बांधकाम करता येवु शकते काय? आणि आपण जी तरतुद सांगत आहात ती कोणत्या अधिनियमाच्या कोणत्या कलमानुसारची आहे ती सांगा. शाळेसाठी आरक्षित असलेल्या भुखंडावर कोणते बांधकाम करता येते आणि ते कोणत्या अधिनियमाच्या कोणत्या कलमानुसार? मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम आपण लागु करता की, एमआरटीपी ॲक्ट लागु करता?

श्री. सी.पी. सिंग (सहा. संचालक नगररचना):—एमआरटीपी ॲक्टनुसार जी बांधकाम नियंत्रण नियमावली आहे.

यावेळी सदस्या श्रीमती चंद्रा टेकंचदानी, श्रीमती लिलाबाई आशान, श्रीमती राजश्री चौधरी, श्रीमती बेबी भोईर यांनी सभागृहात प्रवेश केला.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— गोषवा—यामध्ये तसे लिहिले आहे?

श्री. सी.पी. सिंग (सहा. संचालक नगररचना):—गोषवा—यामध्ये तसे लिहिता येणार नाही. तशी मंजुरी आपण महासभेपुढे मागत आहोत.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— जेव्हा आपण आमच्यापुढे प्रस्ताव आणता तेव्हा आपले कर्तव्य ठरते की, सविस्तर माहिती आमच्यापुढे आणली पाहिजे. शाळेसाठी आरक्षित असलेलया भुखंडावर तात्पुरत्या स्वरुपात ट्रांझिट कॅम्प उभारु शकतो. याबाबत आपण माहिती दिली आहे का? आपण संपुर्ण सभागृहाची दिशाभुल का करत आहात? आपले काम नाही काय की अमुक या कायदयाअंतर्गतच्या अमुक या कलमान्वये आपण या कामी मंजुरी देवु शकतो अशी माहिती देण्याचे? आरक्षित भुखंडावर आपण आम्हांस रुग्णालय बांधु देत नाहीत. आरक्षित भुखंडावर शाळेची इमारत बांधु देत नाहीत? शाळेसाठी आरक्षित असलेल्या भुखंडावर आपण ट्रांझिट कॅम्प कसा बांधत आहात? कोणत्या कायदयानुसार? कोणत्या कलमानुसार?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, आता जो प्रस्ताव आहे तो तात्पुरती शेड उभारुन त्यांची तात्पुरती व्यवस्था करण्या संदर्भातील आहे. तात्पुरती व्यवस्था आपण करु शकतो.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—तात्पुरत्याचा अर्थ काय? जसे आपण अतिरिक्त कार्यभार सोपवता. तीन महिन्याच्या ठिकाणी तीन तीन वर्षापर्यंत चालु ठेवता आपण आता सुध्दा अतिरिक्त कार्यभार सोपवता.

एखादया अधिका–यास आपण अतिरिक्त कार्यभार किती महिन्यापर्यंत देवु शकता? आता सुध्दा तीन तीन, चार चार वर्ष पदभार सोपविला जात आहे. तसे याबाबत सुध्दा होईल म्हणुनच विचारु इच्छितो की तात्पुरता याचा अर्थ काय? व कोणत्या कायदयाच्या तरतुदीनुसार आपण हे करु शकता ते सांगा. शाळेचा भुखंड आहे त्याठिकाणी आपण ट्रांझिट कॅम्प कसा उभारु शकता? उदया शाळेला भुखंडाची आवश्यकता पडली, त्यांनी तशी मागणी केली, त्यांना शाळा बांधायची असेल तर अशावेळी आपण काय करणार? ट्रांझिट कॅम्पमुळे तेथे पुर्णपणे कचरा होवुन जाईल.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—महापौर महोदया, हा जो भुखंड आहे, त्यावर केंद्र शासनाची जी योजना आहे, त्यानुसार अंमलबजावणी करण्यासाठी त्यांना तात्पुरता निवारा करुन दयायचा आहे, त्याठिकाणी कुठल्याही प्रकारचे पक्के बांधकाम होणार नाही.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—मी काय सांगतो की, हे जसे सांगता, एमआरटीपी ॲक्टमध्ये तरतुद आहे.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—यामध्ये वापरात कोणताही बदल होणार नाही. तो प्लॉट ज्या कारणासाठी आरक्षित आहे त्याच कारणासाठी आरक्षित राहिल.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—सहा महिन्याच्या ठिकाणी आपण दोन वर्षाचा कालावधी लावला तर?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—असे काही होणार नाही. महापालिका याबाबतची खबरदारी घेईल.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—सहा महिन्यानंतर ट्रांझिट कॅम्प हटविला नाही तर त्यास कोण जबाबदार राहिल?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—मा. महापौरजी, आयुक्त साहेबांनी सांगितले की, बेघर झालेल्या लोकांच्या निवा–याची तात्पुरती सोय करणार आहोत तात्पुरत्या म्हणजे जोपर्यंत त्यांच्या राहण्याची कायम स्वरुपाची सोय होत नाही तोपर्यंतच ना? त्यानंतर तुम्ही तो ट्रांझिट कॅम्प काढुन टाकणार आहात ना? श्री. जमनुजी आपण हा मुद्दा समजावुन घ्या, आयुक्त साहेब सांगत आहेत की, बीएसयुपीचा जो आता प्रकल्प चालु आहे, त्यानुसार या लोकांच्या तात्पुरत्या निवारासाठी व्यवस्था केलेली आहे. असे असतांना यावर एवढी प्रश्नोत्तरे करण्याची आवश्यकताच नाही ना? तात्पुरता याचा अर्थ काय? तो तुम्हांला समजत असेल, मी मराठीत बोलत आहे. हिंदीमध्ये त्याचा अर्थ......

**यावेळी सदस्य श्री. कुमार उत्तमचंद आयलानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—श्री. धांडेजी, मी आपले म्हणणे समजतो. मराठीपण समजतो. हिंदीसुध्दा समजतो. आपली भाषा सुध्दा समजतो. तात्पुरत्याचा अर्थ सहा महिन्यासाठी, बारा महिन्यासाठी, की दोन वर्षासाठी यापैकी नेमका काय असतो. तात्पुरत्याचा अर्थ मला सांगा. तात्पुरते किती महिन्यासाठी असते? मला मराठीसुध्दा येते, हिंदी सुध्दा येते.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, बीएसयुपीची जी योजना आहे ती केंद्र शासन पुरस्कृत योजना आहे. आणि ही योजना पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी तात्पुरता निवारा उपलब्ध करुन दयायचा आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—मी तेच विचारु इच्छितो की, हा कालावधी सहा महिन्याचा, बारा महिन्याचा आहे की दोन वर्षाचा?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—योजनेचा जितका कालावधी आहे, तितका कालावधी.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—तेच तर मी विचारु इच्छितो, हा कालावधी किती महिन्याचा आहे? महापौरजी हा प्रस्ताव आपल्यासमोर आलेला आहे, आपणांस माहित आहे का किती महिन्याचा कालावधी आहे तो? सहा महिने, बारा महिने, दोन वर्ष?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>बीएसयुपीचा प्रकल्प एक वर्षात पुर्ण करायचा आहे. महापौर महोदया, मी सभागृहाला हे सुध्दा आश्वासन देवु इच्छितो की, बीएसयुपीचे काम पुर्ण झाल्यानंतर जे तात्पुरत्या स्वरुपी बांधलेले निवारे काढुन टाकले जातील.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>मा. महापौरजी व सन्माननिय सर्व सदस्य, आज बीएसयुपीचा जो प्रकल्प शासनाच्या माध्यमातुन महानगरपालिकेतर्फे राबविला जात आहे आणि प्रथमत: तो राहुल नगरमधुन घेतलेला आहे. गरीब लोकांनी झोपडीत न राहता चांगल्या इमारतीमध्ये रहावे हा शासनाचा हेतु आहे त्याचबरोबर महानगरपालिकेचाही हेतु आहे. परंतु गेल्या दोन तीन दिवसापासुन त्याठिकाणी बिल्डर घुसले आहेत. आणि ते झोपडया विकत घेत आहेत. आणि ते झोपडपट्टीधारकांना सांगतात की, तुम्हांला महापालिका फ्लॅट देणार नाही. आताच काय पाहिजे ते पैसे घ्या आणि फ्लॉट खाली करुन दया. अशा प्रकारे जवळ जवळ ७ झोपडपट्टया खाली केलेल्या आहेत. तेथे बिल्डरने तळ ठोकुन आपले कार्यालय थाटले आहे. श्री. कुकरेजा नावाचा बिल्डर आहे. तर मला तुम्ही हे सांगा यावर महापालिका काय करणार आहे? लोक भयभित झाले आहेत, गरीबांना भेटण्यासाठी आज ते महापालिकेत येणार होते. त्यासाठी मी वेळ घेतलेली आहे. मी, श्री. धनंजय बोडारे, उप–महापौर आणि सर्व राजकिय पक्षांचे गटनेते त्या लोकांना भेटावयास जाणार आहोत. आणि भयभीत झालेल्या लोकांना समजावणार आहोत. बिल्डर लोकांना कदापीही फ्लॅट मिळणार नाही. हा प्रकल्प गरीबांसाठीच आहे, झोपडपट्टयांसाठीच आहे आणि त्याचा फायदा तुम्हांलाच दिला जाईल. शासनाचा काही पैसा, काही महापालिकेचा व काही झोपडीधारकाचा पैसा याकामी वापरला जाईल. आणि त्यातुन गरीबांना घर मिळु शकेल. परंतु आजच्या तारखेला तेथे लोक भयभित झाले आहेत. बिल्डर तेथे ठाण मांडुन बसलेला आहे. तेव्हा आयुक्त साहेब, आपण ताबडतोब कारवाई करावी. एकतर पोलिस स्टेशनला पत्र दयावे. या पुर्वी धनधांडग्यांनी जमिनी बळकावल्या आता गरीबांसाठी असलेले शासनाचे प्रकल्प बळकावत आहेत.

<u>महापालिका सचिव :–</u>पास? सर्वसंमतीने?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १ :–** बी.एस.यु.पी प्रकल्पाअंतर्गत राहुलनगर येथिल लाभार्थ्यांसाठी सर्व्हे क्र. ७०५ व खुनी खड्डा (आरक्षित भुखंड क्र. ५) येथिल मोकळया जागेत तसेच वाल्मिकी वसाहत येथिल कर्मचा-यांसाठी उल्हासनगर-५ भुखंड क्र. १०३, शीट क्र. ५४ येथिल मोकळया जागेत तात्पुरते ट्रांझिट कॅम्प उभारणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनर्निर्माण अभियाना अंतर्गत बी.एस.यु.पी. प्रकल्प शहरातील राहुलनगर व वाल्मीकी वसाहत येथे राबविण्यात येत आहे. यामध्ये सदर वसाहती पाडुन राहुलनगर येथे ५ इमारती व वाल्मीकी वसाहत येथे ३ इमारती बांधुन लाभार्थ्यांना सदनिका देण्यात येणार आहेत. या योजनेच्या कामास स्थायी समितीने दिनांक १/६/२००९ च्या ठराव क्र. १३ अन्वये मंजुरी दिली आहे. सदर कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक २५/८/२००९ देण्यात आले आहेत.

राहूलनगर येथिल २४२ व वाल्मिकी वसाहत येथिल ६४ अशा एकुण ३०६ लाभार्थ्यांसाठी सर्वे क्र. ७०५ येथे तात्पुरते ट्रांझिट कॅम्प उभारण्यास स्थायी समितीने ठराव क्र. ७५, दिनांक २४/८/२००९ अन्वये मंजुरी दिली आहे. परंतु सर्वे क्र. ७०५ येथिल उपलब्ध जागेमध्ये फक्त १०२ लाभार्थ्यांसाठी तात्पुरते ट्रांझिट कॅम्प तयार होवू शकतात. त्यामुळे राहुलनगर येथिल उर्वरित १४० लाभार्थ्यांसाठी शहरातील खुनी खड्डा येथिल आरक्षित भुखंड क्र. ०५ मधील मोकळया जागेत ट्रांझिट कॅम्प उभारण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. खुनी खड्डा हया जागेचे आरक्षण खेळाचे मैदान असे असून तेथे १४० तात्पुरते ट्रांझिट कॅम्प उभारण्या इतकी मोकळी जागा उपलब्ध आहे.

तसेच वाल्मीकी वसाहत येथिल ६४ कर्मचा-यांसाठी मंजुर विकास आराखडयानुसार उल्हासनगर-५ येथिल भुखंड क्र. १०३, शीट क्र. ५४ येथिल मोकळया जागेत ट्रांझिट कॅम्प उभारण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. हया जागेचे आरक्षण मंजूर विकास आराखडयानुसार प्राथमिक शाळा असे आहे. प्रारुप विकास योजनेनुसार हा भुखंड क्र. २०३ असा असून याचे आरक्षण शैक्षणिक सुविधेसाठी आहे. तरी सर्वे क्र. ७०५ व्यतिरिक्त खुनी खड्डा येथे आरक्ष्गित भुखंड क्र. ५ तसेच उल्हासनगर-५ येथिल भुखंड क्र. १०३, शीट क्र. ५४ या जागा आरक्षित त्या वरती कोणतेही बांधकाम करता येणार नाही तथापि ट्रांझिट कॅम्पची महानगरपालिकेस निकड असल्याने या आरक्षित मोकळया जागेत तात्पुरते लाभार्थ्यांसाठी ट्रांझिट कॅम्प उभारण्यास मा. महासभेकडुन मान्यता मिळणेस्तव सादर.

<u>विशेष महासभा ठराव क्र.   ४३</u>        <u>दिनांक :–१३/११/२००९</u>

**सुचकाचे नाव :– श्री. तुलसीदास वसिटा**

**अनुमोदकाचे नाव :–श्री. जाधव इदनानी**

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पूनर्निमाण अभियानाअंतर्गत बीएसयुपी प्रकल्प राबवून शहरातील राहुलनगर येथे ५ इमारती व वाल्मिक नगरमध्ये ३ इमारती बांधून लाभार्थ्यांना सदनिका देणे व दरम्यानचे कालावधीत ट्रान्झीट कॅम्पमध्ये पुनर्वसन करण्या प्रयोजनार्थ सर्व्हे क्र. ७०५ व खुनी खड्डा (आरक्षित भुखंड क्र. ५) व भुखंड क्र. १०३, शिट क्र. ५४, उल्हासनगर–५ येथिल मोकळया जागेत तात्पुरता ट्रांझिट कॅम्प उभारण्यास मान्यता देत आहे.

सुचकांची सही/–

अनुमोदकांची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी

विशेष महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २ :–** आपत्कालीन परिस्थितीमुळे बेघर होणा-या लोकांच्या तात्पुरत्या सोयी करीता निवारा बांधणे प्रयोजनार्थ महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये मंजुर विकास आराखडयाच्या आरक्षणात बदल करणे.

---

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>मा. महापौरजी, नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये मंजुर विकास आराखडयाच्या ज्या भुखंडाच्या आरक्षणामध्ये आपण बदल करु इच्छित आहात, मंजुर विकास आराखडयामध्ये असे काही भुखंड आहेत, जे बेघर लोकांच्या घरांसाठी आरक्षित केलेले आहेत. त्या भुखंडाचे काय झाले? त्याचा खुलासा झाला पाहिजे. काय ते भुखंड महापालिकेने संपादित केले आहेत? त्या भुखंडांवर बेघरांसाठी घरे बांधण्यात आली आहेत? त्यांना घरे सुपुर्द करण्यात आली आहेत? काय परिस्थिती आहे? दुस–या भुखंडांच्या वापरामध्ये बदल करण्याचे तात्पर्य काय आहे? या मुद्दयांचा खुलासा होणे जरुरीचे आहे.

<u>श्री. सी.पी. सिंग (सहा. संचालक नगररचना):–</u>मा. महापौरजी, सन्माननिय सदस्यांनी आता जो मुद्दा उपस्थित केला आहे, त्यामध्ये बेघरवाशियांच्या घरासाठी मंजुर विकास आराखडयामध्ये जे भुखंड आरक्षित आहेत त्यापैकी काही जागांचा ताबा आपणाकडे नाही. काही जागांवर अतिक्रमणे झाली आहेत. याबाबतची सविस्तर माहिती पुढील महासभेत दिली जाईल. तथापी ही जी जागा आहे, जिच्या वापरात बदल करण्याचे आपण प्रस्तावित करत आहोत. या जागेचा ताबा महानगरपालिकेला १९८७ मध्ये मिळाला आहे. आणि आता ज्या इमारती कोसळत आहेत, त्यातील रहिवाश्यांच्या राहण्याची आपणांस जी सोय करायची आहे, त्यासाठी तातडीने

आपणाकडे दुसरी जागा उपलब्ध नसल्यामुळे आपण जागेच्या वापरात बदल करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. जेणे करुन तेथे ट्रांझिट कॅम्पची सोय लवकरात लवकर उपलब्ध करुन देता येईल.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—आपण जेव्हा हा प्रस्ताव तयार केला तेव्हा आपणांस माहित असेल की, बेघरवाशियांच्या घरासाठी मंजुर विकास आराखडयामध्ये किती भुखंड आरक्षित आहेत? दुसरे असे की, काय भुंखंडावर अतिक्रमणे झालेली आहेत काय त्या भुखंडावर अतिक्रमणे झाली आहेत? किंवा त्यांचा ताबा महापालिकेकडे आहे? जर त्यांची अगोदर पासुनच कुणाला सनद दिली असेल तर काय ती जागा ताब्यात घेण्यासाठी महापालिकेने कार्यवाही चालु केली आहे? या सर्व बाबींचा विचार केल्यानंतरच आपण प्रस्ताव दयावयास पाहिजे होता. प्रथम आपण याचा विचार करा की, आपणाकडे जे भुखंड आहेत त्यांच्यावर कोणकोणती बाधंकामे करण्यात आली आहेत? त्यांचा वापर का नाही करण्यात आला. ही या प्रस्तावाबरोबर सर्व माहिती आमच्या समोर आली पाहिजे अर्थवट माहितीनिशी आपण प्रस्ताव सभागृहाकडे आणाल तर आम्हाला माहित होणार नाही किती चौरस मीटरचे किती भुखंड आहेत ते, व त्यांचा महापालिकेने त्या अगोदर किती उपयोग केला आहे. हि सर्व माहिती आमच्या समोर असणे आवश्यक आहे.

श्री. सी.पी. सिंग (सहा. संचालक नगररचना):— मा. महोदय, येणाऱ्या सभेमध्ये उर्वरित माहिती आम्ही सादर करु.

सदस्य श्री. राजेश वदारिया :— तर मी मा. महापौरांना निवेदन करेन की, हा विषय पुढे ढकलुन पुढील महासभेसाठी ठेवावा तोपर्यंत या विषयांबाबतची सविस्तर माहिती यांनी आम्हास दयावी.

सदस्य श्री. राजु जग्यासी :— मा. महापौरजी, हा विषय अतिशय चांगला आहे व शहराच्या हिताचा आहे, आज शहरामध्ये काही इमारंतीचे पिर्लर झुकतात तर काही इमारती कोसळतात हे अतिशय दुख दायक असे वातावरण आहे. अशा स्थितीमध्ये बेघर होणाऱ्या लोकांसाठी निवाऱ्यांची कुठेंकुठे व्यवस्था केली पाहिजे व या बाबतीत विचार करणे आपले कर्तव्य आहे. परंतु आपणाकडे सध्या जे आरक्षित भुखंड आहेत त्याच्या वापरामध्ये बदल करुन ते भुंखड वापरात आपण्याचा आपण जो प्रस्ताव आणला आहे तर त्याबाबतीत असा ही एक ठराव पारित करावा जसे आमचे बंधु श्री. राजेश वदारियानी सागिंतले की, जे भुंखड बेघर वासियांच्या घरांसाठी आरक्षित केले आहे, त्या भुखंडावर बाधंकाम करण्यासाठी महानगरपालिका यानंतर कोणतीही बाधंकाम परवानगी मंजूर करणार नाही. आजच या प्रकारचा आपण आदेश देत आहात काय? मला असे वाटते की यापुढे अशी कोणतीही र्दुघटना होऊ नये परंतु झालीच तर ते भुखंड बेघर वासियांना घरे देण्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही कामासाठी वापरले जाणार नाहीत. याबाबतीत मा. महापौर व आयुक्तांनी यांनी आपली भुमिका स्पष्ट करावी.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):— मा. महापौर महोदया, ज्या कामांसाठी जो भुखंड आरक्षित आहे त्याच कामांसाठी तो भुखंड वापरला जाईल, यांनतर नगररचना विभागासा असे निर्देश देण्यात येईल की, एखादा भुखंड बेघर वासियांना घरे देण्यासाठी आरक्षित असेल तर त्या भुखंडाचा वापर त्यासाठीच करण्यात येईल, त्याव्यतिरिक्त बाधंकाम परवानगी देण्यात येऊ नये असे निर्देश नगररचना विभागास देण्यात येतील.

महापालिका सचिव :— पास ?

सदस्य श्री. राजेश वदारिया :— या विषयांबाबतचा जो ठराव तयार करण्यात येईल त्यामध्ये आता जसे आयुक्त साहेंबानी निर्देश दिले आहेत त्यांचा सुध्दा समावेश केला पाहिजे की, बेघर वासियांना घरे देण्यासाठी आरक्षित असलेल्या भुखंडावर यापुढे कोणत्याही प्रकारची बाधंकाम परवानगी दिली जाणार नाही, व त्या भुखंडाची अगोदरच कुणाला सनद दिली असेल तर तो भुखंड ताब्यात घेण्याची कार्यवाही महापालिके मार्फत करण्यात यावी.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):— सन्मा. सदस्य महोदय, मी आपणांस विनंती करतो की, याबाबतचा ठराव मंजुरीसाठी शासनाकडे असल्याने आपण सांगत असलेली ही वाक्य समाविष्ट करणे उचीत होणार नाही. ती वाक्य समाविष्ट केल्यास मंजुरी मिळणे मुश्किल होईल. यास्तव सभागृहास माझी विनंती आहे की, हा ठराव वेगळा ठेवु या. आपण जो विषय ठेवु इच्छिता त्याबाबतीत पुढील सभेच्या पटलावर सविस्तर माहिती आणतो.

<u>महापालिका सचिव :–</u>पास? सर्वसंमतीने?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २ :–** आपत्कालीन परिस्थितीमुळे बेघर होणा-या लोकांच्या तात्पुरत्या सोयी करीता निवारा बांधणे प्रयोजनार्थ महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये मंजुर विकास आराखडयाच्या आरक्षणात बदल करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीमध्ये धोकादायक इमारती कोसळून त्यामधील रहिवासी बेघत होत आहेत. अशा लोकांच्या निवा-यासाठी कोणतीही सोयीसुविधा किंवा जागा महानगरपालिकेकडे उपलब्ध नसल्याने खाजगी जागेमध्ये बेघर होणा-या लोकांची पर्यायी व्यवस्था करावी लागते. यासाठी उल्हासनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आरक्षणामधील खालील भूखंडाचा वापर कायमस्वरुपी इमारत बांधून त्यामध्ये बेघर लोकांचे तात्पुरती सोय करणे योग्य होईल. त्यासाठी खालील आरक्षणाचा विचार करणे आवश्यक आहे.

उल्हासनगर कॅम्प नं. १ येथिल शिट नं. ८३ मधील मंजूर विकास आराखडयानुसार आरक्षण क्र. २, प्लॉट नं. १७७ (भा), यु.नं. १९८, ४.७७ एकर, १.९९ हेक्टर क्षेत्र खेळाचे मैदान यासाठी आरक्षित आहे व प्रारुप विकास आराखडयानुसार आरक्षण क्र. २१ मनोरंजनासाठी खुली जागा यासाठी आरक्षित आहे. सदर जागेचा कागदोपत्री ताबा १९८७ मध्ये उल्हासनगर प्रशासक यांच्याकडुन महानगरपालिकेस देण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना व अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये सदर जागेचा वापर कायमस्वरुपी Transit Quarter बांधणे आधी शासनाच्या आदेशानुसार विकास योजनेतील आरक्षणात बदल करणे योग्य राहील. तसेच Transit Quarter बांधणेकामी खुपच निकड असल्यामुळे शासनाकडुन विकास योजनेमधील किरकोळ फेरबदलास अंतिम मंजुरी मिळणेआधी विशेष बाब म्हणून पूर्व परवानगी प्राप्त करुन घेण्यासंबंधात प्रशासनास कार्यवाही करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

यास्तव शासन स्तरावर आदेश होणेसाठी पाठवावयाच्या प्रस्तावावर मा. सर्वसाधारण सभेसमोर ठेवुन कृपया मान्यता घ्यावी.

<u>विशेष महासभा ठराव क्र. ४४</u> <u>दिनांक :–१३/११/२००९</u>

**सुचकाचे नाव :–** श्री. बी.बी. मोरे

**अनुमोदकाचे नाव :–** श्री. रामचंद्र पारवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे खेळाचे मैदानासाठी आरक्षित असलेली मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र.२, प्लॉट नं. १७७ (भा.) यु. नं. १९८ शिट नं ८३ उल्हासनगर कॅम्प नं. १ येथिल ४.७७ एकर १.९९ हेक्टर जागेचा व मनोरंजनासाठी खुली जागा म्हणून आरक्षित असलेल्या प्रारूप विकास आराखडयानुसारच्या आरक्षण क्र २१ च्या जागेचा बेघर लोकांच्या तात्पुरत्या निवा–यासाठी कायम स्वरूपी Transit Quarter बांधण्याकामी शासनाच्या मंजुरीस अधिन राहून विकास योजनेतील आरक्षणात बदल करणेस मान्यता देत आहे.

सुचकांची सही/–

अनुमोदकांची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३ :—**स्थायी समिती ठराव क्र. १८, दिनांक १/६/२००९ नुसार चालता नं. १३०२२, शिट नं. २८ अन्वये नोंद असलेली रिकामी जागा बांधा वापरा व हस्तांतरीत करणे बाबत अटी शर्तीमध्ये केलेल्या फेरबदलाबाबत निर्णय घेणे.

---

**सदस्य श्री. सुरेश जाधव :—** हा जो ठराव आपल्या महासभेत आला आहे, त्यासाठी सर्वात प्रथम उच्च न्यायालयाला धन्यवाद देतो. कारण त्यांच्यामुळे हा ठराव आमच्यासमोर आला आहे. नाहीतर काही सदस्यांकडुन आमच्या उल्हासनगर शहराचे भविष्य विकण्यात आलेले आहे. हा जो ठराव त्यांनी केला आहे, त्यानुसार ही जागा पुर्णपणे एका ठेकेदाराच्या हवाली केलेली आहे. याबाबतीत मी जास्त काही बोलत नाही. ज्या अटी शर्ती देण्यात आलेल्या आहेत, आमच्या महानगरपालिकेचे काही सदस्यांनी मिळुन आमच्या शहरातील मुलाबाळांचे भविष्य विकले आहे. याबाबतचे तीन मुद्दे मी आपल्या लक्षात आणुन देवु इच्छितो. तीन अटी शर्ती त्यांनी दिल्या आहेत. पहिले तर कराराचा कालावधी भोगवटाप्रमाणपत्राचे दिनांकापासुन ९९ वर्षाचा असेल, अट क्र. ३ पाणी पट्टी आकारणी घरगुती दराने करण्यात येईल. ९९ वर्ष म्हणजे किती मोठा कालावधी झाला? मला वाटत नाही की, एवढे वर्ष या सदस्यांमधील कुणी सदस्य जिवंत राहिल म्हणुन? म्हणजे आमच्या शहरातील मुला बाळांच्या भवितव्यासाठी ती जागा आम्ही त्या ठेकेदाराला विकत आहोत. दुसरा मुद्दा असा आहे की, पाणी पट्टी आकारणी घरगुती दराने आकारण्यात येईल. तीन हेक्टर जागेस किती पाणी लागते? त्यासाठी किती पाणी पट्टी आकारण्यात येईल हेही त्यात लिहिलेले नाही. आणि घरगुती दराने पाणी पट्टी आकारणी केली जाईल? तो ठेकेदार त्या जागेचा व्यवसायिक वापर करणार आणि त्यास पाणी पट्टी मात्र घरगुती दराने आकारणार? हे या ठिकाणी असे दर्शविते की, किती मोठा घोटाळा चालु आहे? तसेच आणखी एक अट अशी आहे की, सदर प्रकल्पासाठी विकासधारकास मालमत्ता करापासून सुट देण्यात येईल. का बरं? तो काय महापालिकेचा जावई आहे? त्याला तुम्ही सुट देता? या तीन अटींवरुन समजुन येते की, या प्रकरणांमध्ये किती मोठा घोटाळा झाला आहे? या महासभेत मी सर्वांना विनंती करतो की, या विषयावरचा ठराव पारीत करण्यात येवु नये. मी या प्रस्तावास विरोध करत आहे.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**मा. महापौर, मा. उप—महापौर, आयुक्त व सभागृहातील सर्व सन्माननिय सदस्य, मी सुध्दा मा. श्री. सुरेश जाधव यांच्या मताशी सहमत आहे. ९९ वर्षासाठी तुम्ही त्या ठेकेदाराशी करार करण्याचा प्रस्ताव या सभागृहापुढे आणला आहे. असे वाटते की, येणारी आमची पिढी आम्हांला शिव्या देणार आहे. ९९ वर्षासाठी एखादी जागा आम्ही ठेकेदाराच्या घसात देतो आहे. ही फार मोठी दु:खाची गोष्ट आहे. आणि शरमेची देखील गोष्ट आहे. कोणी प्रस्ताव आणला आणि कोणाच्या संमतीने हेच आम्हाला कळत नाही. आमचे असे म्हणणे आहे की किमान तीस वर्षासाठी ठेका देण्यात यावा, ९९ वर्ष म्हणजे फार झाले, ९९ वर्षासाठी आपण त्या ठेकेदारास ती जागा देणार, ९९ वर्ष तो ठेकेदार तरी जीवंत राहणार आहे का? त्याची पिढींनपिढी बसुन खाणार आहे या अटीशर्ती आम्हाला मान्य नाहीत, दुसरी गोष्ट म्हणजे जे पाणीपटट्ीचे दर तुम्ही दिलेले आहेत तो घरगुती दराप्रमाणे आहेत त्यासाठी माझे असे म्हणणे आहे की पाणीपट्टीचे दर व्यवसायांना असले पाहिजेत त्याला आपण सुट का दयावी. तो त्याठिकाणी बसून कमावणार आहे. तो त्याची रोजी रोटी कमावणार आहे. आपण त्यास ९९ वर्षासाठी ती जागा दयायची आणि पाणी पट्टीचा दर घरगुतीदराने आकारायचा. ही कुठली पध्दत आहे? त्याला व्यवसायिक दराप्रमाणेच पाणीपट्टीची आकारणी झाली पाहिजे. या विषयीचा महासभेने जरी ठराव पारीत केला तरी त्या ठेकेदारास फक्त २५ ते ३० वर्षासाठीच जागा देण्यात यावी. अशी मी सभागृहातील सर्व सदस्यांना विनंती करतो. आणि या ठिकाणीच गोषवा—यामध्ये जे दिले आहे ते महानगरपालिकेने प्रत्येक वर्षासाठी भाडे म्हणुन निश्चित किमान देकार रक्कमे ऐवजी विकासधारकाने प्रकल्पाची सखोल शहानिशा किंवा पडताळनी करून प्रत्येक वर्षासाठी भाडे रक्कम स्वत: नमुद करावी. या ठिकाणी आयुक्त साहेबांनी हे स्पष्ट करावे की, मागच्या वेळेस देकार रक्कम किती होती आणि आता किती आहे? आणि सर्व सन्माननिय सदस्यांना विनंती करतो की, ९९ वर्षासाठी ही जागा भाडयाने देण्याची कोणी चुक करु नये. पुढील पिढी आपणांस माफ करणार नाही हा आपल्या मुलाबाळांचा प्रश्न आहे. आज आपल्याकडे असे भुखंड कमी आहेत आणि असे भुखंड जर बिल्डराच्या घसात टाकले तर येणारी पिढी

माफ करणार नाही हे लक्षात ठेवा.आणि अटी, शर्ती ज्या दिलेल्या आहेत त्या कठोर करण्यात याव्यात. या ठेकेदारावर अत्यंत कडक अटी, शर्ती लावण्यात याव्यात.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :— ५ व्या क्रमांकाची अट काय आहे ती पहा.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—महापौर महोदयांनी उत्तर दयावे.

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, मालमत्ता):—मा. महापौर महोदया, महासभेने जो ठराव पारीत केला होता, त्यामध्ये किमान देकार प्रत्येक महिन्यासाठी भाडे म्हणुन ३० लाख ३२ हजार आठशे बत्तीस रुपये ठेवले होते.

**यावेळी सदस्य श्री. महेश सुखरामानी, श्री. संजय बठिजा, श्री. सुंदर मंगतानी श्री. नरेंद्र कुमार ठाकुर, श्री. किशोर जग्यासी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—रक्कम किती ठेवली आहे?

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, मालमत्ता):—३०, ३२, ८३२/— रुपये.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—प्रत्येक वर्षाला कि महिन्याला?

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, मालमत्ता):—प्रति महिना भाडे म्हणुन.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—किती किमान?

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, मालमत्ता):—३०,३२,८३२/— रुपये.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—ती महापालिकेला परवडणारी रक्कम आहे का?

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, मालमत्ता):— पुर्वीची आहे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—पुर्वीची आहे, आताची किती ठरविली आहे?

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, मालमत्ता):—आता रक्कम ठरविलेली नाही.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—अजुन तुम्ही काहीच ठरविलेले नाही फक्त पास करण्यासाठी आणला आहे. त्यानंतर आम्ही हो बोलायचो त्यानतर तुम्ही कमी करणार जास्त करणार ते आम्हाला कसे माहीत पडेल? आम्हाला काही पुरावा हवा, हा विषय तुम्ही आणला ते ठीक आहे परंतु रक्कम किती घेणार काय घेणार याच्यावर काही पुरावा? मागच्या वेळेस तीस लाख केले ते याच्यावर नमुद केलेले नाही? रक्कम नमुद केली पाहिजे होती ना?

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, मालमत्ता):— ती रक्कम विकासकाने नमुद करायची आहे?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :— कोणी?

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, मालमत्ता):— जो विकसित करणार आहे त्यांनी.

सदस्य श्री. सतिश चहाळः— सन्मा. महापौर महोदया, उप महापौरजी, आयुक्त साहेब, जागेची जी निविदा...

सदस्य श्री. बी.बी मोरेः— सदस्य श्री. प्रशांत धांडे यांच्या प्रश्नाला डॉ दिपक सावंत यांना बरोबर उत्तर देता येत नाही. तर कृपया आयुक्त साहेबांनी या प्रश्नांचे उत्तर सविस्तरपणे दयावे.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ:— </u> ९९ वर्षाच्या करारांने या जागेची निविदा निघते, त्यामध्ये पार्टी स्वत: नमुद करेल की किती भाडे दयावे म्हणुन? ही सभागृहास लाजीरवाणी गोष्ट आहे,

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :— </u> विकासक म्हणेल मी एक महिन्यांनी भाडे देतो हे चालेल का तुम्हाला?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):— </u> सन्मा. महापौर महोदया, जरी महानगरपालिकेने भाडे निश्चित केले नसेल आणि विकासकाने जरी त्याचे भाडे निश्चित केले असेल त्यास आपण निविदा देऊ, त्यात महापालिका निश्चितपणे भाडे ठरवेल, त्यानुसार तुलनात्मक तक्ता करुन जर महापालिकेला परवडणारे असेल, फायदेशीर असेल तरच पुढची कार्यवाही केली जाईल.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :— </u> मा. आयुक्त साहेब, असा कुठचा कायदा आहे की ठेकेदार भाडे ठरवणार ? महापालिकेच्या जागेचे भाडे ठेकेदार ठरवितो, हे कुठपत योग्य आहे?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):— </u> सन्मा. महापौर महोदया, भाडे ठरविण्याचा प्रश्न नाही? भाडे त्यांनी नमुद करायचे आहे? जर महापालिकेस वाटेल भाडे योग्य आहे तरच पुढील कार्यवाही केली जाईल अन्यथा त्याचा जो प्रस्ताव आहे तो मजुर करता येणार नाही.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :— </u> आयुक्त साहेब, उल्हासनगरची ही पहिलीच जागा नाही. आम्ही टाऊन हॉल देखील भाडयाने दिलेला आहे. टाऊन हॉलचे भाडे बिल्डर आपल्या खिशात घालतो आहे याचा आम्हाला चागला अनुभव आहे. बोट क्लबची परिस्थिती तशीच होणार आहे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :— </u> अश्या किती प्रॉपरटी विकणार आहोत शहराच्या?

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ:— </u> महापौर महोदया, ९९ वर्षाच्या कराराने जी मालमत्ता भाडयाने दिली जात आहे ती देऊ नये. कारण ही मालमत्ता विकलीच जाणार आहे. महापालिकेला विकले जाणार आहे......

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :— </u> हा ठराव रदद् करावा.

<u>सदस्य श्री. बी.बी मोरे:— </u> सन्मा. महापौरजी, आयुक्त साहेब, या महापालिकेतर्फे स्वीमिंग पुल भाडयाने देण्यात आलेला आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :— </u> मा. महापौरजी, हा ठराव रदद् करावा.

<u>सदस्य श्री. बी.बी मोरे:— </u> गोल मैदान भाडयाने दिलेले आहे, शहराच्या........

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :— </u> आपण या शहराला विकु नका?

<u>सदस्य श्री. बी.बी मोरे:— </u> ९९ वर्षाच्या कराराने मालमत्ता भाडयाने दिली तर आपोआपच ती मालमत्ता बिल्डरची होते. आणि म्हणुन ९९ वर्षाचा जो करार केला आहे तो करण्यात येऊ नये. तीस वर्षाचा करार ठिक आहे. आणि तसेच त्याच्यामध्ये पाणीपटट्ी बदद्लच्या ज्या सुधारणा आहेत त्या करण्यात याव्यात.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ:— </u> महापौर साहेब, उप महापौरजी, हा करार रदद् करावा.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :— </u> मा. महापौर, उप महापौरजी, हा करार रदद् करावा,

यावेळी सदस्याच्या एकत्रित आवाजामुळे कोण नेमके काय बोलत होते हे समजुन येत नव्हते.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ:— </u> हे महापालिका विकायला निघालेले आहेत?

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर:— </u> मा. न्यायालयाने आपलयाकडे पाठविला आहे, आपण निर्णय घ्यायचा आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :– </u> म्हणुन सागंतो, हा विषय रदद् करावा.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:– </u> मतदान घ्या.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :– </u> हा विषय रदद् करावा, सभागृहाच्या गॅलरीत पत्रकार बसलेले आहेत.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ:– </u> ९९ वर्षाच्या कराराने ही मालमत्ता विकलीच जाणार आहे?

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव:– </u> किती लोक शहराला विकायला निघाले आहेत? हे लोकांना कळु दया.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :– </u> शहराला विकण्याचा विषय, हि किती चुक केली आहे.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u> शासनाचे हे धोरण आहे 'बांधा वापरा हस्तातरीत करा' या धर्तीवर सदर जागेचा विकास करण्याचा हा प्रस्ताव आहे, जागा विकण्याचा अथवा कोणाला जागा देण्याचा हा प्रस्ताव नाही.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :– </u> अहो आयुक्त साहेब, आपण म्हणता जागेचा विकास करण्याचा हा प्रस्ताव आहे हे ठीक आहे? परंतु ९९ वर्षासाठी विकासकाच्या घशात टाकता हा कोणता विकास आहे? ९९ वर्ष त्याची पिढी बसुन खाणार. इथे आम्हाला रहायचे आहे, याचा विचार आम्हाला करायचा आहे.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u> मा. महापौर महोदया, तुम्हाला जरी विचार करायचा असेल तरी शहराच्या विकासासाठी.........

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव:– </u> विरोधात निर्णय होणार आहे याची सर्वाना खात्री आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :– </u> हा शहराच्या विकासाचा मुदद्ा नाही, शहराला विकायचे काम काढलेले आहे.

<u>सदस्य श्री. रविद्र बागुल:–</u> आयुक्त साहेब, आपण विकासाची निशानी बोलत आहात परंतु विकासकाची निशानी तशीच पडुन आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :– </u> हे शहराचे विकासाचे काम नाही, शहराला विकायचे काम काढले आहे.

<u>सदस्य श्री. रविद्र बागुल:–</u> श्री. धांडे साहेब, विकासाची निशानी पडुन आहे. आता कुठला विकास राहिला? विकास नाही, साहेब.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :– </u> आजच्या या सभेत मा. आमदार साहेब सुध्दा बसलेले आहेत.

<u>सदस्य श्री. बी.बी मोरे:–</u> आयुक्त साहेब, या मुदद्यावर सर्वच सदस्य बोलत आहेत, हे बरोबर नाही. तर ९९ वर्षाचा जो करार आहे तो करण्यात येऊ नये. आणि त्यामध्ये ज्या दोन तीन अटी आहेत पाण्याची, मालमत्तेची त्यामध्ये देखील फेरफार करावा अश्या पध्दतीने सर्वच सन्मा. सदस्यांना.......

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u> मा. महापौर महोदया, हा जो प्रस्ताव आलेला आहे त्यामध्ये स्थायी समितीने निर्णय घेतलेले होते, अटीशर्ती होत्या. त्या अटीशर्तीला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले, उच्च न्यायलयाने सागिंतले की, त्या ज्या अटीशर्ती आहेत त्या महासभेत घ्या, त्याची मंजुरी घ्या

यावेळी सदस्याच्या एकत्रित आवाजामुळे कोण नेमके काय बोलत होते हे समजुन येत नव्हते.

<u>सदस्य श्री. बी.बी मोरे:–</u> या प्रस्तावामध्ये फेरबदल करण्यासाठी आम्ही सुचना माडंत आहोत.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u> स्थायी समिती आपल्याला जसा वाटेल तसा कारभार करेल चालेल का? मा. आयुक्त साहेब, १६ सदस्य, १६ नगरसेवक शहराला विकायला निघाले आहेत. आणि त्याला मान्यता दयायची हे आमच्याकडुन होणार नाही. आमचा विरोध आहे या विषयाला.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:–</u>विरोध आहे, आणि विरोध राहणारच.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव:–</u>साहेब, याच्यावर निर्णय झालाच पाहिजे.

यावेळी सदस्या श्रीमती कविता सिरवानी, श्रीमती निना नाथानी, श्रीमती शकुंतला पाटील, श्रीमती ज्योती चैनानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u>मा. महापौर महोदया, यावर निर्णय झालाच पाहिजे. हे आम्हांला मंजुर नाही. ९९ वर्षाचा करार आम्हांला मंजुर नाही.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>९९ वर्षासाठी हा करार करु नये बोट क्लब भाडयाने देवु नये.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u> शहराला विकण्याचे पाप आमच्याकडून होणार नाही आणि आम्ही ते करणार नाही.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>सन्माननिय सदस्य, आपल्या गोषवा–यामध्ये हे स्पष्टपणे नमुद केले आहे आणि हा निर्णय सभागृहाने घ्यावा. त्यावर आपण बसुन चर्चा करु या.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>यामध्ये अट क्र. ५ आहे.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u> अटीशर्तीचे पालन करुन त्यापध्दतीने तो ठराव पास करावा.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u> मा. महापौर महोदया, उप महापौर, आयुक्त साहेब आपल्या कार्यालयात वर्तमानपत्र येत असतील त्याची लिपिक व शिपाई कात्रण ठेवत असतील, तर, लोकमत मध्ये पहिल्या पानावर ही बातमी आलेली आहे की, उल्हासनगर शहर हे विकायला काढलेले आहे, याची आपण जाण ठेवा. शहरातील नागरीकांनी हे वाचलेले आहे, शहरातीलच नाही तर पुर्ण महाराष्ट्राच्या लोकांनी हे वर्तमान पत्र वाचलेले आहे तरीदेखील आपण निर्लजासारखा तो भुखंड विकायला काढलेला आहे आणि त्यात काही सदस्य साथ देत आहेत. हे पाप आहे, लोकमत वर्तमान पत्रामध्ये पहा श्री. बी. बी. मोरे यांच्या हातात लोकमत वर्तमान पत्र आहे तरीदेखील आपण निर्लजासारखे हा भुखंड विकायला काढलेला आहे, यापेक्षा शरमेची गोष्ट नाही.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u> ठेकेदाराच्या घशामध्ये बोट क्लब घालत आहात अशापध्दतीने सर्व सदस्यांना माझी विनंती आहे......

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> सचिव साहेब, ५ नंबरची जी अट आहे, महानगरपालिकेने प्रत्येक वर्षासाठी भाडे म्हणुन निश्चित किमान देकार रक्कम ऐवजी विकासधारकाने प्रकल्पाची सखोल शहानिशा किंवा पडताळनी करून प्रत्येक वर्षासाठी भाडे रक्कम स्वत: नमुद करावी, याचा अर्थ सागांवा.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u> हे स्थायी समितीचे सदस्य आहेत, त्यांनीच हा भुखंड विकलेला आहे, आणि तेच प्रश्न विचारत आहेत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> महापालिकेने किती भाडे निश्चित केले आहे हे तर सांगावे?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u> श्री. जमनुजी आपण स्वत: स्थायी समितीचे सदस्य आहात आपण अधिका–यांना प्रश्न का विचारत आहात?

<u>डॉ. दिपक सावंत(उप–आयुक्त):–</u>विकासकाने स्वत: त्याबाबत निर्णय घ्यायचा आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आणि आम्ही जे भाडे निश्चीत केले आहे ते?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> आम्ही जे भाडे निश्चीत केले आहे त्याचे काय?

<u>डॉ. दिपक सावंत (उप–आयुक्त):–</u>सार्वजनिक बांधकाम विभाग व नगररचना विभाग यांनी स्वत: भाडे नमुद करायचे आहे..

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे:–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, अट क्र. ६ मध्ये विकासधारकास आवश्यकता वाटल्यास तो वित्तीय संस्थांनकडुन कर्जाची उभारणी करू शकतो व त्यासाठी फक्त कराराच्या कालावधी पर्यत जमीन व प्रकल्प गहाण ठेवण्याची मुभा असावी. आपण असे सरळसरळ अधिकार एखादया ठेकेदाराला देतो. सदरची मालमत्ता ही महानगरपालिकेची असून आपण त्याला वित्तीय संस्थांकडे गहाण ठेवण्यासाठी देतो. उदया त्या ठेकेदाराने कर्जाची रक्कम परत केली नाही तर वित्तीय संस्था महानगरपालिकेच्या जागेची जप्ती काढतील याचा विचार कोणी केलेला नाही. उदया तो कर्जाची रक्कम परतफेड करेलच याची काही आपण हमी देवु शकत नाही. ९९ वर्षाकरीता म्हणजे जवळ जवळ आपल्या तीन ते चार पिढया निघुन जातात. हा सगळा कारभार अनाकलनीच आहे, महानगरपालिकेची जमिन, राज्य शासनाची जमिन, सीटीएस क्र. १३०२२ शिट नं. २८ हा भुखंड आपणच एकप्रकारे आपले अधिकारी गण, ठेकेदार मिळुन गिळंकृत होण्याचा कट आहे. आणि विकल्यात जमा आहे, असे आमचे सहकारी मित्र श्री. धांडे, श्री. जाधव यांनी आपल्यासमोर मांडलेले आहे. म्हणुन आपणांस विनंती आहे की, हा ठेका ९९ वर्षासाठी न देता किमान २ ते ५ वर्षासाठी देण्यात यावा. याचे जिवंत उदाहरण म्हणजे सफाईसाठी जो ठेकेदार आपण नेमलेला आहे, १० वर्षासाठी आपण त्याच्याबरोबर करारबध्द झाले असतांना गेली ५ वर्ष तो कश्याप्रकारे आपल्याला लोटागण घालायला लावतो आहे, शहराची काय परिस्थिती आज? रस्ते कच–याने तुडुंब भरुन गेले आहेत, याकडे आपल्या कोणत्याही अधिका–याची किंवा आपल्या अधिका–या वर्गाची, कुणाचीही नजर जात नाही. वारंवार नगरसेवक, जनतेने तक्रार करुन सुध्दा ठेकेदारावर कुणीही कारवाई करत नाही. आणि जर ९९ वर्ष यांना ही जागा देण्यात आली तर ती आपणाकडे राहिल का? यासाठी या प्रस्तावास माझा विरोध आहे. कृपया हा प्रस्ताव आपल्या महासभेत पास करु नये.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>मा. आयुक्त साहेब, मी तर म्हणतो या प्रस्तावाची सीआयडी मार्फत चौकशी झाली पाहिजे. जो येतो तो आपल्या शहराला विकायला निघाला आहे. ज्यांनी हा प्रस्ताव आणलेला आहे त्यांच्यावर चौकशी नेमली पाहिजे. अशी आमची मागणी आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब व सचिवजी, हा वादग्रस्त विषय आहे. सर्व सदस्यांनी या विषयावर त्यांची मते व्यक्त केली आहेत. यापुर्वीच्या महासभेमध्ये बोट क्लब व इतर काही जागा बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर देण्यासाठी प्रस्ताव पारीत झाला आहे. त्यातील काही अटी जाचक होत्या असे प्रशासनाचेच मत झाले. त्यांनी तसे नमुद केले की, तीन ते चार वेळा निविदा मागविल्या. परंतु कुणी निविदा भरली नाही. त्यामुळे आम्ही पुन्हा फेर निविदा काढत आहोत. आणि निविदेतील अटी आणि शर्तीमध्ये बदल करण्यासाठीचा अधिकार फक्त महासभेला असतांना आपल्या निंबुध्द प्रशासनाने स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठविला. स्थायी समितीने त्यास होकार दिला. प्रशासनाचा गळथान कारभार, मग आयुक्त कुणीही असू दे, अधिकारी कुणीही असू दे पण त्यांच्या कारभारात गोंधळ निर्माण झाला आहे. जर तुम्हांला जाण असती, महासभेचे अधिकार कोणते, स्थायी समितीचे अधिकार कोणते हे जर माहित असते तर ही गफलत झाली नसती. आणि मग त्याच वेळेस त्यामध्ये बदल झाला असता. परंतु स्थायी समितीमध्ये प्रस्ताव पाठवितांना, चूकुन पाठवितांना, आमच्या स्थायी समिती सदस्यांना किंवा त्यांच्या सभापतींना त्यांचे अधिकार माहित नाहीत. परंतु प्रशासनाचे प्रमुख म्हणुन तुमच्या अधिका–यांना तरी त्यांचे अधिकार माहित पाहिजे होते. परंतु ते नसल्यामुळे न्यायालयाची चपराक बसली, न्यायालयाची चपराक उल्हासनगर वाशियांवर पडली. उल्हासनगरमध्ये जे चालते ते सगळे गलथान आहे. येथे गैरकारभार चालतो येथे कायदयाचे राज्य नाही. आणि मग कुठलेही पिटीशन गेले की, तेथिल जज किंवा न्यायाधिशांसाठी आपण पुर्वग्रहदुषित वातावरण निर्माण करतो. स्थायी समितीमध्ये ठराव बेकायदेशीररित्या पारीत झाला आणि नंतर उच्च न्यायालयाने निर्देश दिले म्हणुन याठिकाणी हा प्रस्ताव आणलेला आहे. श्री.बी.बी. मोरे साहेब, श्री. सुरेख जाधव, श्री. प्रशांत धांडे आणि श्री. रविंद्र बागुल, श्री. नरेंद्र दवणे यांनी मुद्दे उपस्थित केले आहेत की या ठरावाबाबत आपण काय करायचे? हे मत आपण सर्वांनी व्यक्त करायचे, ९९ वर्षासाठी दयायचे नसेल तर किती वर्षासाठी दयायचे? घरगुती दराने कर आकारणी करायची नाही तर कोणत्या दराने कर आकारणी करायची? परंतु आता वर्षानुवर्षे

पडलेला भुखंड त्याठिकाणी गणपती विसर्जन करण्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणासाठी कोणीही तेथे जात नाही. फक्त गणपती विसर्जनासाठी आपण तो भुखंड वापरतो. नगरपालिका अस्तित्वात असल्यापासुन तो भुखंड तसाच पडुन आहे. त्याठिकाणी वापर करण्याचा आपण कधीही प्रयत्न केला नाही. उल्हासनगरमध्ये भरीव स्वरुपाचे काम होत नाही म्हणून ती टाउन हॉल आम्ही बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर दिला. असे इतर महापालिका मध्ये सुध्दा होते. परंतु या कराराच्या ज्या अटी, शर्ती आहेत त्यामध्ये नक्कीच बदल झाला पाहिजे. मग भाडे काय ठेवायचे तो शेवटी प्रशासनाचा अधिकार आहे. आता जे भाडे ठरविले आहे तसे माफक भाडे ठरविणे योग्य नाही. आता प्रशासनाने काय भाडे निश्चित केले आहे? यापुर्वी काय भाडे निश्चित केले होते? ते यामध्ये आले नाही. ते काय निश्चित करावयास पाहिजे होते ते प्रशासनाने याठिकाणी नमुद करावे आणि माझी सर्व सभागृहाला विनंती आहे, या शहराच्या दृष्टीने योग्य वाटेल असा निर्णय घेवुन ठराव पारीत करा, वर्षानुवर्षे तो भुखंड पडुनच आहे.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>सन्माननिय महापौर महोदया, आता महासभेपुढे जो प्रस्ताव आहे, ज्या अटी व शर्ती स्थायी समितीने ठरविल्या होत्या, त्या अटी व शर्तीला मंजुरी देण्याबाबत अथवा महासभेला जे योग्य वाटेल तो निर्णय घ्यायचा आहे. महासभेने यापुर्वी जो निर्णय घेतला होता आणि त्यामध्ये जर स्थायी समितीने बदल केले असतील तर कायदेशीरदृष्टया ते योग्य नाही. महासभा ही स्थायी समितीपेक्षा वरीष्ठ आहे. महासभेचे सर्व निर्णय स्थायी समितीवर व इतर समित्यांवर बंधनकारक आहेत. जर प्रशासनाने याबाबत चुक केली असेल तर, यानंतर अशी चुक होणार नाही याची खबरदारी घेण्यात येईल. सदर जागेकरीता जो मुळ प्रस्ताव होता, सदर जागेकरीता भाडे म्हणुन ३०,३२,८३२/– रुपये किमान देय आकार प्रस्तावित करण्याचे निश्चित झाले होते. आमचा प्रस्ताव असा होता. त्यात स्थायी समितीने नंतर बदल केले. त्यामुळे दुरुस्ती करण्यात आली. सभागृह निर्णय घेण्यास स्वत: सक्षम आणि सार्वभौम आहे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>यावर निर्णय घ्यायला एवढा वेळ का लागत आहे? हा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>स्थायी समिती ठराव क्र. १८, दिनांक १/६/२००९ चा जो ठराव आज महासभेपुढे कायम करण्यासाठी आला आहे, त्याविषयी मी काही बोलु इच्छितो. स्थायी समितीमध्ये हा जो ठराव पारीत झाला आहे तो सर्वसंमतीने पारीत झाला आहे. तेथे सर्व राजकिय पक्षांचे सदस्य आहेत,

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>स्थायी समितीने ही जागा विकली आहे असे म्हणा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौर महोदया, मी आपणांस निवेदन करतो की, जेव्हा मी बोलत असतो तेव्हा मध्ये दुस–या कुणी बोलु नये. त्यांना जेवढे काही बोलायचे असेल ते त्यांनी माझ्यानंतर बोलावे. सर्व सदस्यांना आपण निर्देश दया की, माझे भाषण संपल्यानंतरच ज्या कुणाला बोलायचे असेल त्यांनी बोलावे. पाहिजे तर मी नंतर बोलतो आता कुणाला बोलायचे असेल त्यांनी बोलुन घ्यावे. सभागृहाचा आदर ठेवा. आपणांस बोलायचे असेल तर आपण बोला. मी बसून घेतो. जेव्हा मी बोलत असेन तेव्हा आपण मध्ये बोलु नका.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, ती जागा विकली आहे असे जे सदस्य म्हणत आहेत त्यांनी नाव घेवुन बोलावे. कोणत्या सदस्याने जागा विकली आहे. संपुर्ण सभागृहावर हे लांक्षण लावणे चुकीचे आहे. कोणत्या व्यक्तीने जागा विकली आहे, त्याचे पुराव्यानिशी नाव घ्यावे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>मी कुणाचे नाव घेतलेले नाही. ज्यानी विकली असेल तो बोलेल. ज्याला वाटत असेल मी जागा विकली आहे तर तो बोलेल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौरजी, बाकी सदस्यांना शांत राहण्यास सांगा. माझ्यानंतर ज्या कुणाला बोलायचे असेल त्यांनी बोलावे. हा विषय जेव्हा स्थायी समितीपुढे आला, त्याबद्दल मी सांगु इच्छितो की, याबाबत तीन वेळा निविदा काढण्यात आली होती. जेव्हा आम्ही याबाबतीत कोणतीही अट व शर्त ठेवलेली नव्हती जो बोट क्लब २५ वर्षापासुन बंद आहे, त्याची आम्ही तीन वेळा निविदा मागविली होती. आयुक्त साहेबांचा खुलासा आहे की, तीन वेळा वेगवेगळया वर्तमानपत्रामध्ये जाहिराती देवुनही निविदा प्राप्त न झाल्याने चौथ्यांदा आम्ही बिना अटी, शर्तीची निविदा काढली. परंतु एक पण निविदा प्राप्त झाली नाही.

त्यानंतर आम्ही सर्व पक्षाच्या गटनेत्यांनी स्थायी समितीच्या १६ सदस्यांनी आपसामध्ये विचार विनिमय करुन अटी, शर्तीमध्ये बदल करण्याचा निर्णय घेतला जेणेकरुन एखादा ठेकेदार बोटक्लबच्या सुशोभिकरणासाठी २०–२५ कोटी रुपये लावल्यानंतर त्याला सुध्दा काही तरी फायदा होवु शकेल. या सर्व बाबी लक्षात घेवुन तसेच शहरास एक सुंदर वास्तु मिळावी. या सर्व बाबींचा विचार करुन या अटींचा समावेश करण्यात आलेला आहे. जेव्हा हा ठराव पारीत केला तेव्हा सर्व पक्षांचे सदस्य स्थायी समितीत होते. यास्तव मी निवेदन करेन की, अधिक वेळ न घालविता, या महासभेत यावर मतदान घेतले जावे. धन्यवाद।

<u>महापालिका सचिव:–</u>मतदान घ्यायचे काय?

<u>काही सदस्य :–</u>पास, पास……

<u>महापालिका सचिव :–</u>पास? सर्व संमतीने? कुणाचा विरोध आहे का?

<u>सदस्य श्री.अनिल ऐलानी :–</u>माझा विरोध आहे.


<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे :–</u>९९ वर्षासाठी देण्यास माझा विरोध आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>तर मग मतदान घेतले जावे काय?

<u>महापौर :–</u>सचिव साहेब, या विषयावर मतदान घ्या.

मा. सदस्य श्री. प्रशांत धांडे व श्री. सुरेश जाधव हे सभागृहातुन बाहेर गेले.  

<u>महापालिका सचिव :–</u>जे सन्माननिय सदस्य या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.



<u>प्रस्तावाच्या बाजुने ६६ मते</u>

| | |
|---|---|
| १ | श्रीमती विद्याताई निर्मले |
| २ | श्री. विनोद लालसिंग ठाकुर |
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर |
| ४ | श्रीमती संगीता राजेश कंडारे |
| ५ | श्री. रविंद्र दशरथ बागूल |
| ६ | श्री. रामसागर जनार्दन यादव |
| ७ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत |
| ८ | श्री. मोरे भानजी भिकारी |
| ९ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र |
| १० | श्री. विजय खंडु सुपाळे |
| ११ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १२ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान |
| १३ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी |
| १४ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) |
| १५ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी |
| १६ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी |
| १७ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| १८ | श्री. राजू जग्यासी |

| | |
|---|---|
| १९ | श्री. राम (चार्ली) पारवानी |
| २० | श्री. हरेश परमानंद जग्यासी |
| २१ | श्रीमती जया प्रकाश माखीजा |
| २२ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी |
| २३ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी |
| २४ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम |
| २५ | श्री. भठीजा (बब्बु) संजय |
| २६ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा |
| २७ | श्री. लाल पंजाबी |
| २८ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास |
| २९ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती |
| ३० | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी |
| ३१ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय |
| ३२ | श्री. ढोके जनार्दन किसनराव |
| ३३ | श्री.एडके गणपत गोविंद |
| ३४ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा |
| ३५ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ३६ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ३७ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ३८ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ३९ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ४० | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ४१ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ४२ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ४३ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ४४ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ४५ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| ४६ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| ४७ | श्री. शेखर केशव यादव |
| ४८ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| ४९ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ५० | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| ५१ | श्री. किशोर जग्यासी |
| ५२ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| ५३ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| ५४ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| ५५ | श्रीमती ज्योती शाम माने |
| ५६ | श्रीमती लता शांताराम निकम |
| ५७ | श्री. मोहन साधवाणी |
| ५८ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| ५९ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| ६० | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| ६१ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| ६२ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ६३ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| ६४ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ६५ | श्री. मुकेश सोहन तेजी |

| | |
|---|---|
| ६६ | श्री. पाटील प्रधान धर्मा |

<u>महापौर :–</u>जे सन्माननिय सदस्य या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत. श्री. सुरेश जाधव कुठे आहेत? ते बाहेर गेले आहेत काय?

<u>काही सदस्य :–</u>ते बाहेर गेले आहेत.

<u>महापालिका सचिव :–</u>मनसेचे सदस्य कोणत्या बाजुने आहेत? त्यांनी हात वर केले नाहीत.

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे :–</u>९९ वर्षाकरीता देण्यास माझा विरोध आहे, बाकी प्रस्तावास माझा विरोध नाही.

<u>महापालिका सचिव :–</u>९९ वर्षासाठी जागा भाडयाने देण्याच्या प्रस्तावास बाकी सदस्यांनी संमती दर्शविली आहे. आपला विरोध आहे. यासाठी एकतर आपण हात वर करा किंवा तटस्थ रहा.

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे :–</u>तुम्ही काय म्हणता?

<u>महापालिका सचिव :–</u>९९ वर्षासाठी देण्यास यांनी हात वर करुन संमती दर्शविली आहे.

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे :–</u>बाकी ज्या अटी, शर्ती आहेत त्या आम्हांस मान्य आहेत. मात्र ९९ वर्षासाठी माझा विरोध आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>तर ठिक आहे. तीन सदस्य प्रस्तावाच्या विरोधात आहेत.

<u>प्रस्तावाच्या विरोधात ३ मते</u>

१. श्री. अनिल (विदयार्थी) ऐलानी
२. श्री. नरेंद्र दवणे
३. सै. जयश्री ज्ञानेश्वर पाटील

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत बहुमताने पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ३ :–** स्थायी समिती ठराव क्र. १८, दिनांक १/६/२००९ नुसार चालता नं. १३०२२, शिट नं. २८ अन्वये नोंद असलेली रिकामी जागा बांधा वापरा व हस्तांतरीत करणे बाबत अटी शर्तीमध्ये केलेल्या फेरबदलाबाबत निर्णय घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयास अनुसरून उल्हासनगर शहराच्या हददीमधील कॅम्प नं 3 मधील हिराघाट मंदिराजवळ , सीटीएस क. 13022 शिट नं. 28 अन्वये नोंद असलेली रिकामी जागा विकसीत महानगरपालिकेच्या स्थापनेपासुन महानगरपालिकेच्या ताब्यात असुन तिचा वापर उदयान व मनोरंजन केंद्राचे प्रयोजनार्थ बांधा , वापरा व हस्तांतरीत करा या पध्दतीने विकसीत करणे व सदरहुन जमीनीचा मालकी हक्क महानगरपालिकेस हस्तांतरीत करणे कामी प्रशासनास शासनाकडे पाठपुरावा करणे कामी मा. महासभा ठराव क. 31 दिनांक 18/10/2008 नुसार मंजुरी देण्यात आले होती.

सदर प्रस्तावात विकासधारकाने करावयाची विकास कामे , देखभाल दुरूस्ती तसेच विकासधारकाने केलेली गुतवणुक परत मिळणे साठी अनुज्ञेय प्रयोजन या बाबींचा समावेश करण्यात आला होता. त्याअनुषंगाने दिनांक 08/11/2008 रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेस प्रतिसाद प्राप्त न झाल्याने पुन्हा दिनांक

16/12/08 व दिनांक 02/02/09 रोजी निविदा मागविण्यात आल्या. परंतु तीनही वेळेस कोणताही प्रतिसाद प्राप्त झाला नाही. सदर प्रस्तावाची वस्तुस्थिती अवलोकनार्थ मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात आली होती.

सबब, तीन वेळा देण्यात आलेल्या जाहिरातीस प्रतिसाद प्राप्त न झाल्याने निश्चित करण्यात आलेल्या अटी व शर्तीतुन काही अटी व शर्ती पुढील प्रमाणे फेरफार मा. स्थयी समिती ठराव क्र. 18, दिनांक 01/06/2009 अन्वये मंजुरी देण्यात आली आहे.

1. कराराचा कालावधी भोगवटा प्रमाणपत्राचे दिनांकापासुन 99 पासुन असेल.
2. सदर प्रकल्पासाठी विकासधारकास मालमत्ता करातुन सुट देण्यात येईल.
3. पाणी पटटी आकारणी घरगुती दराने करण्यात येईल.
4. प्रकल्पातील क्षेत्रात जाहिरात लावून त्यातुन भाडे वसुल करण्याची मुभा विकासधारकास राहील. व त्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्काची आकारनी महापालिकेतर्फे करण्यात येणार नाही.
5. महानगरपालिकेने प्रत्येक वर्षासाठी भाडे म्हणुन निश्चित किमान देकार रक्कम ऐवजी विकासधारकाने प्रकल्पाची सखोल शहानिशा किंवा पडताळनी करून प्रत्येक वर्शासाठी भाडे रक्कम स्वतः नमुद करावी.
6. विकासधारकास आवश्यकता वाटल्यास तो वित्तीय संस्थांनकडुन कर्जाची उभारनी करू शकतो व त्यासाठी फक्त कराराच्या कालावधी पर्यत जमीन व प्रकल्प गहाण ठेवण्याची मुभा असावी.
7. विकासधारकाची दि. 31/03/2009 रोजी भांडवली स्थीती 10 करोड असावी व त्यासाठी 2008–09 या वर्षाचे लेखा परिक्षण करण्यात आलेले लेखा विवरणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
8. निविदाधारकाने पुर्ण झालेल्या मागील 3 वर्षात म्हणजे वर्ष 2006 –07, 2007–08, 2008 – 09 मध्ये प्रत्येक वर्षी 100 कोटी रक्कमेची उलाढाल केलेली असावी. व त्यासाठी 3 वर्षाचे लेखा परिक्षण करण्यात आलेले लेखा विवरण पत्र सादर करणे आवश्यक आहे.
9. संयुक्तपणे सादर केलेली निविदा स्विकारण्यात येवू नये.
10. निविदाधारकाची राष्टीयकृत /श्येडयुल्ड किंवा सहकारी बॅकेमार्फत जारी करण्यात आलेली सॉलवन्सी किमान देकार रक्कमेच्या 50 करोड एचढी असावी.
11. विकासधारकास वेळोवेळी मंजुर विकास नियंत्रण नियमावलीनुसार वाढीव विकास करणे अनुज्ञेय राहील.

उक्त फेरबदल करून पुन्हा दिनांक 18/06/2009 रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. एकुन 7 निविदाधारकांपैकी चार निविदा धारकांने इसारा रक्कम भरली होती. त्यांचे नाव खालील प्रमाणे आहे. 1) साई प्रॉपरटीज 2) साई होम 3) कोणार्क इन्फ्रॉस्टक्चरर्स 4) अशोका बिल्डकोन लि. निविदा दाखल करून घेण्याचा अंतिम दिनांक 01/07/2009 रोजी मा. उच्च न्यायालय ,मुंबई येथे मे. साई प्रापर्टीज यांचेमार्फत मा. स्थायी ठराव क्र. 18 दि. 01/06/2009 मध्ये निविदाधारकाने पुर्ण झालेल्या मागील 3 वर्षात म्हणजे वर्ष 2006 –07, 2007–08, व 2008 – 09 मध्ये प्रत्येक वर्षी 100 कोटी रक्कमेची उलाढाल केलेली असावी. व त्यासाठी 3 वर्षाचे लेखा परिक्षण करण्यात आलेले लेखा विवरण पत्र सादर करण आवश्यक आहे. या अटी व शर्ती टाकल्या कारणाने रिट पिटीशन क्र. 5676/2009 दाखल करण्यात आले होते. स्थायी समितीने सदर अटी व शर्ती शितील करणेसाठी मा.महासभेची मंजुरी घेतली नाही असा मुददा याचीकेत नमुद केलेले आहे. तरी दि. 23/07/2009 रोजी मा. उच्च न्यायालयासमोर उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे नियुक्त अधिविता यांनी लेखी माहिती दिली की सदर प्रकरण मध्ये मा. महासभेच्या निर्णयानुसार सदर जागा विकसीत करणे करीती निविदा मागविण्याची प्रक्रिया महानगरपालिका पुर्ण करेल. या बाबत मा. उच्च न्यायालयाने अशी लेखी मागणी मान्य करून सदर याचीका फेटाळली तरी मा. उच्च न्यायलयात महापालिकातर्फे दिलेले आश्वासन व आदेशनुसार स्थायी समिती ठराव क्र. 18 दि. 01/06/2009 अन्वये निविदाच्या अटी व शर्ती मध्ये केलेले फेरबदल मा. महासभे पुढे निर्णयार्थ सादर

<u>विशेष महासभा ठराव क्र. ४५</u> <u>दिनांक :–१३/११/२००९</u>

**सुचकाचे नाव** :– श्री. जमनादास पुरस्वानी

**अनुमोदकाचे नाव** :— श्री. मोहनदास रामरख्यानी

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार स्थायी समिती ठराव क्र. १८, दिनांक १/६/२००९ नुसार चालता नं. १३०२२, शिट नं. २८ अन्वये नोंद असलेली रिकामी जागा बांधा वापरा व हस्तांतरीत करणे बाबत अटी शर्तींमध्ये केलेला फेरबदल कायम करीत आहे व त्याप्रयोजनार्थ पुर्वीचा महासभा ठराव क्र. ३१, दिनांक १८/१०/२००८ मध्ये अंशत: फेरबदल मानण्यात येईल.

सुचकांची सही/—

अनुमोदकांची सही/—

बहुमताने

महापौर/पीठासीन अधिकारी

विशेष महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ४.३८ वाजता पहिल्या सभेचे कामकाज संपल्याचे व दुस—या सभेस सुरुवात करण्यांत येत असल्याचे मा. महापौर श्रीमती विद्या निर्मले यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— १९/१२/२००९

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/१२/२००९ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

वि—१०

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा शनिवार दिनांक १९/१२/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. महापौर —— श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र

२. उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३२ | श्री. कुमार उत्तमचंद आयलानी |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३३ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३४ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ३५ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ३६ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ८ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ३७ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ३८ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १० | श्री. मोरे भानजी भिकारी | ३९ | श्री. शेखर केशव यादव |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४० | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १२ | श्रीमती निर्मले विद्या विजय | ४१ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १३ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४२ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १४ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४३ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १५ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४४ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १६ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४५ | श्री. किशोर जग्यासी |
| १७ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ४६ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १८ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ४७ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| १९ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ४८ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २० | श्री. राम (चार्ली) पारवानी | ४९ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २१ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५० | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २२ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५१ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २३ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५२ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २४ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम | ५३ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २५ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ५४ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| २६ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ५५ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| २७ | श्री. लाल पंजाबी | ५६ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| २८ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ५७ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| २९ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ५८ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३० | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ५९ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३१ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ६० | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| | | ६१ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के, २. श्री. राजू जग्यासी, ३. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, ४. श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा, ५. श्रीमती शकुंतला पाटील, ६. श्री. मोहन (गारो) रामरख्यानी, ७. ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी, ८. श्री.एडके गणपत गोविंद, ९. श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा, १०. श्रीमती वेलकर सुरेखा राजन, ११. श्रीमती महाडीक रजनी मोहन, १२. श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी, १३. श्रीमती करोतीया मालती राधाचरण, १४. श्री. बोडारे धनंजय बाबूराव, १५. श्रीमती बोडारे वसुधा धनंजय, १६. श्रीमती चेनानी ज्योती रमेश, १७. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, १८. श्री. मोहन साधवाणी, १९. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), २०. श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी

श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त हे आयुक्तांच्या स्थायी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त
२. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३. श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त
४. श्रीमती संगिता धायगुडे, उप—आयुक्त, आरोग्य
५. श्री. संतोष देहरकर, उप—आयुक्त
६. श्री. सी.पी. सिंग, सहा. संचालक, नगररचना
७. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
८. श्री. ह.न. जमादार, उपमुख्य लेखा परिक्षक
९. डॉ. जी.टी. जिंदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
१०. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
११. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
१२. श्री. एस. एम. अली, उप अभियंता, पाणी पुरवठा

१३. श्री. के. सेलवन, प्र. उप अभियंता, पाणी पुरवठा
१४. श्री. भरत बठिजा, उप अभियंता, स्थापत्य
१५. श्री. जितु चौथानी, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य
१६. श्री. कुमार जग्यासी, उपअभियंता, कर
१७. श्री. रमेश काजळे, प्र. प्रभाग अधिकारी
१८. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१९. श्री. लाल लालचंदानी, जकात अधिक्षक
२०. श्री. विशाल कदम, वरिष्ठ लिपिक, साप्रवि

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. तानाजी पतंगराव
२. श्री. श्याम शिवनानी
३. श्रीमती अमिता संखे
४. श्रीमती नर्गिस खान

दुपारी १२.३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सभा सुरु होण्याअगोदर मी एक शोक प्रस्ताव मांडु इच्छितो. सन्माननिय गटनेते श्री. धनंजय बोडारे साहेब तसेच सन्माननिय नगरसेविका श्रीमती वसुधा धनंजय बोडारे यांचे सासरे व श्री. धनंजय बोडारे यांचे वडिल श्री. बाबुराव सखाराम बोडारे यांचे वृध्दोपकाळाने दिनांक ७ डिसेंबर, २००९ रोजी निधन झाले. तरी मी महासभेपुढे विनंती करतो की, त्यांना श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. महापौर महोदया, आपल्या सभागृहातील कॉग्रेस पक्षाचे सदस्य श्री. मोहन साधवानी यांच्या मातोश्रीचे देखिल निधन झाले आहे. त्यांना सुध्दा श्रध्दांजली दिली जावी.

---

सुचकाचे नाव :— श्री. दिलीप गायकवाड
अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

**शोक प्रस्ताव**

उल्हासनगर महानगरपालिकेतील सन्माननिय गटनेते श्री. धनंजय बोडारे साहेब तसेच सन्माननिय नगरसेविका श्रीमती वसुधा धनंजय बोडारे यांचे सासरे व श्री. धनंजय बोडारे यांचे वडिल श्री. बाबुराव सखाराम बोडारे यांचे वृध्दोपकाळाने दिनांक ७ डिसेंबर, २००९ रोजी निधन झाले.

तसेच कॉग्रेस पक्षाचे सदस्य श्री. मोहन साधवानी यांच्या मातोश्री श्रीमती भानवारी रहंदोमल साधवानी यांचेही नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे.

श्री. बाबुराव सखाराम बोडारे व श्रीमती भानवारी रहंदोमल साधवानी यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ५८ अ** **दिनांक:—१९/१२/२००९**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. बाबुराव सखाराम बोडारे, श्रीमती भानवारी रहंदोमल साधवानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>सदस्य श्री. राजेश वधारिया:–</u>**मा. महापौरजी, श्री. प्रभुनाथ गुप्ता यांची विरोधी पक्ष नेता पदी नियुक्ती करण्याबाबतीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने जे पत्र देण्यात आले आहे त्याबाबतीत मागील महासभेत सांगण्यात आले होते की, याबाबतचा निर्णय पुढील महासभेत घेतला जाईल. तर त्याबाबत आपण काय निर्णय घेतला आहात? व आमचे निवेदन आहे की, त्यांना विरोधी पक्ष नेता म्हणुन नियुक्त केले जावे.

**<u>उप–महापौर :–</u>**याबाबत सर्वसाधारण सभेत निर्णय घेतला जाईल.

**<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :–</u>**मा. महापौरजी, विशेष महासभा व महासभेमध्ये काहीही फरक नाही. जो निर्णय आपणांस जाहिर करायचा आहे तो आताही आपण जाहिर करु शकता किंवा नंतरही जाहिर करु शकता. तसेच आपण आपल्या कार्यालयात बसून सुध्दा याबाबतची घोषणा करु शकता. याबाबतीत कोणतेही निर्बंध नाही. विशेष महासभेमध्ये याबाबतचा निर्णय आपण घेवु शकत नाही असे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात कोठेही लिहिलेले नाही. असे लिहिले आहे का? राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ही विरोधी पक्षासाठी सर्वात मोठी पार्टी आहे त्यांना आपणांस पद दयायचे आहे तर दयायचेच आहे ना? या महासभेत नाही, पुढच्या महासभेत, विशेष महासभेत नाही, सर्वसाधारण महासभेत असे सांगण्यात काय अर्थ आहे?

**<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>**सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, आज श्री. राजेश वधारिया यांनी.................

**<u>उप–महापौर :–</u>** श्री. मोरे साहेब, कृपया आपण जरा बसुन घ्या. ही विशेष महासभा आहे, पुढच्या सर्वसाधारण सभेत याबाबतीत चर्चा करु. मेहरबानी करुन या सभेत चर्चा करु नका. सभा सूचनेवर जे विषय आहे त्यांवर चर्चा करा.

**<u>महापालिका सचिव :–</u>** विषय क्र. १ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १ :–** वित्तीय वर्ष २००९-१० मध्ये महापालिकेतर्फे टॅंकरद्वारे पाणी पूरवठा करणेसाठी दर आकारणी करण्यास मान्यता देणे.

---

**<u>काही सदस्य :–</u>**हा विषय सभेच्या कार्यसुचीवरुन वगळण्यात यावा.

**<u>महापालिका सचिव :–</u>**हा विषय पुढे ढकलायचा काय? सर्वसंमतीने?

**<u>काही सदस्य :–</u>**होय.

**<u>महापौर :–</u>** सदरचा विषय वगळण्याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १ :–** वित्तीय वर्ष २००९-१० मध्ये महापालिकेतर्फे टॅंकरद्वारे पाणी पूरवठा करणेसाठी दर आकारणी करण्यास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरातील असलेली पाणी वितरण व्यवस्था अत्यंत जूनी, अपू-या क्षमतेची आहे. शहराला पाणी पुरवठयाचा स्वत:चा स्त्रोत नसल्यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाणी विकत घेवून वितरीत केले जाते. म.औ.वि.मंडळाकडून होणा-या पाणी पुरवठयात वारंवार व्यत्यय निर्माण होत असतो. शहरात पुरेशा क्षमतेच्या साठवण टाक्या नसल्यामुळे अनेक भागांना बुस्टर पंपांच्या मदतीने पाणी पुरवठा करावा लागतो. विद्युत पुरवठा खंडीत झाल्यानंतर पाणी पुरवठयावर परिणाम होतो. वरील कारणांमुळे निर्माण होणा-या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी टॅंकरद्वारे पाणी पुरवठा करणे अपरिहार्य आहे. महानगरपालिकेतर्फे मागील चार ते पाच वर्षापासून टंचाई सद्श्य परिस्थिती हाताळण्यासाठी टॅंकरद्वारे विनाशुल्क पाणी पुरवठा केला जात

आहे. सद्य परिस्थितीत टॅंकरसाठी प्रतिखेप रू २७०/- एवढा खर्च महापालिका करत आहे. विना शुल्क टॅंकर पुरविल्यामुळे सतत मागणी वाढत आहे.

उल्हासनगर वगळता इतर महानगरपालिका / नगरपालिका टॅंकर सेवा सशुल्क पुरवित आहे. टॅंकरने पाणी पुरवठा सेवा विना शुल्क असल्याने महानगरपालिकेवर वाढणारा आर्थिक बोजा मोठा असून या सेवेसाठी शेजारी असणा-या महानगरपालिका/ नगरपालिका प्रमाणे येथेही वाहतूक खर्च आकारणी केल्यास मोठया प्रमाणात असलेला आर्थिक बोजा महानगरपालिकेवर पडणार नाही आणि वाहतूक खर्च आकारणी झाल्यास टॅंकर खर्चही कमी होईल.

महानगरपालिकेने या कामासाठी गेल्या वर्षातील केलेला खर्च पुढील प्रमाणे आहे.-

| अ.क्र. | वर्ष | खर्च |
|---|---|---|
| १ | १९९८-१९९९ | रू ११ लाख |
| २ | १९९९-२००० | रू ५० लाख |
| ३ | २०००-२००१ | रू ५५ लाख |
| ४ | २००१-२००२ | रू ८४ लाख |
| ५ | २००२-२००३ | रू १२३ लाख |
| ६ | २००३-२००४ | रू १२८ लाख |
| ७ | २००४-२००५ | रू ५९ लाख |
| ८ | २००५-२००६ | रू ७८ लाख |
| ९ | २००६-२००७ | रु. ८४ लाख |
| १० | २००७-२००८ | रु. १६० लाख |
| ११ | २००८-२००९ | रु. ८७ लाख |

उपरोक्त परिस्थिती पाहता, या कामाचा खर्च दरवर्षी सारखा वाढत आहे. शासनाने वेळोवळी निर्गमीत केलेल्या आदेशाप्रमाणे पाणी पुरवठा '' ना नफा ना तोटा'' या तत्वावर चालविणे आवश्यक आहे. दिनांक २०/०६/२००३ रोजीच्या महासभेत मंजुर केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने प्रशासनातर्फे टॅंकरव्दारा केल्या जाणा-या पाणी पुरवठयासव शुल्क आकारणे संबंधी खालील प्रमाणे प्रस्ताव पुन्हा सादर करण्यात येत आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेने पाणी पुरवठा योजना क्र. २ मंजूर करतांना ठराव क्र. १५ दि १९. ७.०२ अन्वये योजना '' ना नफा ना तोटा '' या तत्वावर चालविण्याची हमी दिलेली होती. शिवाय महापालिकेने दिनांक २०.६.०३ रोजीच्या महासभेत पाणी पुरवठा सेवेवर श्वेतपत्रिका सादर केलेली होती. त्यास ठराव क्र. २४ दि २०.६.०३ अन्वये मंजूरी मिळालेली असून त्यात टॅंकरद्वारे केल्या जाणा-या पाणी पुरवठयावर शुल्क आकारणी प्रस्तावाचा समावेश आहे.

अ) ७००० लिटर क्षमतेचा टॅंकर पाणी व वाहतूक खर्चासह रू २५०/- प्रति खेप
ब) १०००० लिटर क्षमतेचा टॅंकर पाणी व वाहतूक खर्चासह रू ३००/- प्रति खेप
क) ७००० लिटर क्षमतेचा टॅंकर भरून देणे , वाहतुक खर्च वगळता रू ७०/- प्रति खेप
ड) १००० लिटर क्षमतेचा टॅंकर भरून देणे , वाहतुक खर्च वगळता रू १००/- प्रति खेप

सदरच्या प्रस्तावास महासभा ठराव क्र. ६७ दि १८.२.०४ अन्वये मंजूरी देण्यात आली होती. सदर ठरावानुसार टॅंकरद्वारे केल्या जाणा-या पाणी पुरवठयात दि १.४.०५ ते दि ८.४.०५ पर्यत शुल्क आकारणी करण्यात आली होती. परंतू विशेष महासभा
ठराव क्र. ९४ दि ८.४.०५ अन्वये दि ३०.६.०५ पर्यत टंचाई ग्रस्त भागात टॅंकरने करण्यांत येत असलेल्या पाणी पुरवठयावर वाहतूक खर्चाची आकारणी न करता मोफत पाणी पुरवठा करण्यास मान्यता देण्यात आली होती.

त्यानंतर विशेष महासभा ठराव क्र. २२ दि २२.६.०५ अन्वये पूर्वीचा विशेष महासभा ठराव क्र. ९४ दि ८.४.०५ अन्वये खालील प्रमाणे अंशत: बदल करण्यात आलेला आहे.

जोपर्यत प्रशासन संपूर्ण शहरात नळाद्वारे समान व पुरेशा दाबाने पाणी पुरवठा करीत नाही तोपर्यत टंचाई ग्रस्त भागात टॅंकरने करण्यात येत असलेल्या पाणी पुरवठयावर वाहतुक खर्चाची आकारणी न करता मोफत पाणी पुरवठा करण्यास मान्यता देत आहे.

तरी वित्तीय वर्ष २००९-१० करिता टॅंकरद्वारे पाणी पुरवठा करणे करिता दर आकारणी करणे बाबतचा प्रस्ताव खालील प्रमाणे

अ) ७००० लिटर क्षमतेचा टॅंकर पाणी व वाहतूक खर्चासह रू ३२०/- प्रति खेप
ब) १०००० लिटर क्षमतेचा टॅंकर पाणी व वाहतूक खर्चासह रू ४५०/- प्रति खेप
क) ७००० लिटर क्षमतेचा टॅंकर भरून देणे , वाहतुक खर्च वगळता रू १००/- प्रति खेप
ड) १०००० लिटर क्षमतेचा टॅंकर भरून देणे , वाहतुक खर्च वगळता रू १४०/- प्रति खेप

महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु नागरी पुर्ननिर्माण अभियान या योजनेत भाग घेतला असुन पाणी पुरवठा, मलनिस्सारण भुयारी गटार योजना, रस्ते विकास व ई-गव्हर्नन्स हे प्रकल्प राबविण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहेत. वरील पैकी ई-गव्हर्नन्स व पाणी पुरवठा योजनेसाठी रु. १२७.६५ कोटीच्या प्रकल्पास मंजुरी प्राप्त झाली आहे व उर्वरित प्रस्ताव विचाराधीन असुन त्यावरही निर्णय लवकरच होणेची अपेक्षा आहे. तोपर्यंत या सर्व योजना यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महापालिकेस स्वत:चा हिस्सा म्हणुन रक्कम उपलब्ध करावी लागेल व काही रक्कम कर्ज स्वरुपाने उभारावी लागेल. महानगरपालिकेने केंद्र शासन, राज्य शासन यांच्या दरम्यान करण्यात आलेल्या त्रिपक्षीय करारात महापालिकेने पाणी पुरवठा योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालविणेची हमी दिली आहे. सदर कराराची अमंलबजावणी न केल्यास महापालिकेस जे.एन.एन.आर.यु.एम. योजने अंतर्गत पुढील हप्ते प्राप्त होणार नाहीत व याचा परिणाम संपुर्ण योजनेवर होईल

सबब टॅंकरव्दारे पाणी पुरवठा करणेसाठी दर आकारणीचा प्रस्ताव मा. महासभेच्या मान्यतेसाठी पटलावर सादर करण्यात येत आहे.

<u>विशेष महासभा ठराव क्र. ५८ ब</u>          <u>दिनांक :—१९/१२/२००९</u>

**सुचकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी**

**अनुमोदकाचे नाव :— श्री. जे.के. ढोके**

ही महासभा वित्तीय वर्ष २००९-१० मध्ये महापालिकेतर्फे टॅंकरद्वारे पाणी पूरवठा करणेसाठी दर आकारणी करण्यास मान्यता देणेबाबतचा विषय सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

**कारण--**

२००९-२०१० चा अर्थसंकल्प संपृष्टात येत असून नविन अर्थसंकल्प २०१०-२०११ तयार करण्याच्या वेळी सदरहु विषय विचारात घेता येईल.

सुचकांची सही/-
अनुमोदकांची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. २ :—** वित्तीय वर्ष २००९-१० साठी पाणी पट्टीचे दर फेरनिश्चित करणेस मान्यता देणे.

---

<u>काही सदस्य :—</u>हा विषय सभेच्या कार्यसुचीवरुन वगळण्यात यावा.

<u>महापालिका सचिव :—</u>हा विषय पुढे ढकलायचा काय? सर्वसंमतीने?

<u>काही सदस्य :—</u>होय.

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. २ :—** वित्तीय वर्ष २००९-१० साठी पाणी पट्टीचे दर फेरनिश्चित करणेस मान्यता देणे.

## प्रस्तावना

मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३(२०) नुसार महापालिका हद्दीतील नागरिकांना पुरेसा व स्वच्छ पाणी पुरवठा करणे हे महापालिकेचे आदय कर्तव्य आहे. दि २०.१२.९४ रोजी पाणी पुरवठा योजना उल्हासनगर महानगरपालिकेस शासनाकडून हस्तांतरीत करण्यात आली होती. त्या दिवसापासून महानगरपालिका सदरची सेवा अर्थसहाय्य देवनू (Subsidised Rates) सर्वाना पुरवित आहे. शहरातील नागरिकांना पाणी पुरवविण्यासाठी महापालिकेचा स्वत:चा कोणताही स्त्रोत नसल्याने एम. आय.डी.सी.कडून आजतागायत पाणी खरेदी करीत असून एम.आय.डी.सी. सदर पाणी खरेदी दरात सतत वाढ करीत आहे. दि ३१.३.२००३ पर्यत शहरातील सर्व मिळकतींना पाणी पट्टी आकारणी नियतकालीक दराने केली जात होती. त्यानंतर वित्तीय वर्ष २००३—०४ मध्ये वाणिज्य वापर होत असलेल्या कोणत्याही जागांना पाणी पुरवठा केंद्रातून पाणी पुरवठा होत नसेल तर त्यास पाणी पट्टी बसविण्यात येणार नाही. असा निर्णय महासभेत दि २०.२.०३ अन्वये घेण्यात आला. महासभा ठराव पारीत झाल्याच्या १५ दिवसांच्या अवधीनंतर एम.आय.डी.सी.ने पूर्वीचे ५७५०/— प्रति एम.एल. दरामध्ये वाढ करून त्याऐवजी ७०००/— प्रति एम.एल. दराने वाढ केल्याने महापालिकेवर ५ कोटींचा अतिरिक्त आर्थिक भार पडला आहे. परिणामी महापालिकेची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहे व पाणी पुरवठा सेवांसाठी देण्यात येणा—या अनुदानामुळे शहरातील विकास कामांवर खर्च करणेसाठी निधी उपलब्ध होवू शकत नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३० व १३४ मध्ये पाणी पट्टी व पाणी पुरवठा लाभ कर आकारणी बाबतच्या तरतुदी नमुद केल्या आहेत. त्यात पाणी पट्टी आकारणीसाठी खालील पर्याय उपलब्ध आहेत.

१) नळजोडणी धारकाच्या मिळकतीचे करयोग्य मुल्य लक्षात घेऊन करयोग्य मुल्ल्याच्या टककेवारीने पाणी पटटी व पाणी पुरवठा लाभ कर या नावाने अतिरिक्त पाणी पट्टी आकारणी करणे.

२) नळ जोडणीचा आकार व ज्या प्रयोजनासाठी पाणी वापरण्यात येते त्यावरून दर निर्धारित करणे.

३) पाणी मोजणी करून ज्या प्रयोजनासाठी पाणी वापरण्यात येते त्यासाठी वेगवेगळे दर निर्धारित करून आकारणी करणे.

४) ठराविक काळासाठी नळ जोडणीधारकाबरोबर दराबाबत तडजोड करणे.

सद्या महानगरपालिका शहरातील ग्राहकांना इमारतीच्या बांधकामाच्या प्रकारानुसार पाणी दर आकारणी करीत असून हे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ क्र | बांधकामाचा प्रकार | दर |
|---|---|---|
| अ | आर. सी. सी.व टिअर गर्डर बांधकाम इमारती | १५० प्रतिमहा |
| ब | पत्र्याचे छत व विट बांधकाम | ७५ प्रतिमहा |
| क | झोपडपट्टी घरपट्टी धारक, लफाटा किंवा पत्र्यांचे छत असलेले झोपडे, मातीचे झोपडे | ६० प्रतिमहा |

पाणी पुरवठा सेवांवरील वाढत जाणारा खर्च लक्षात घेता, पाणीपट्टी दरात वाढ करणे क्रमप्राप्त आहे. अधिनियमाचे कलम १३४(१)(ब) मधील तरतुदी लक्षात घेऊन सन् २००९—२०१० या आर्थिक वर्षासाठी निवासी मिळकतीवर आकारावयाच्या पाणी पट्टी कराचे दर खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ क्र | बांधकामचे स्वरुप | सन् २००८—२००९ चे प्रचलीत दर | सन् २००८—२००९ चे उत्पन्न प्रचलीत दरा नुसार | सन् २००९—२०१० साठी प्रस्तावित दर | सन् २००९—२०१० चे उत्पन्न प्रस्तावित दरा नुसार | अपेक्षित वाढ | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आर सी सी व टीअर गर्डर बांधकाम. | रु. १५० प्रति महा रु. १८०० प्रतिवर्ष | ४५,७८४ x १८०० = ८,२४,११,२००/— | रु. ३००प्रतिमहा रु. ३६०० प्रतिवर्ष | १६,४८,२२,४०० | ८,२४,११,२०० | दरवाढ प्रस्तावित |
| २ | पत्र्याचे छत व विट बांधकाम | रु. ७५ प्रतिमहा रु. ९०० प्रतिवर्ष | ६२,५४२ x ९०० = ५,६२,८७,८०० /— | रु. १५० प्रतिमहा रु. १८०० प्रतिवर्ष | ११,२५,७५,६०० | ५,६२,८७,८०० | दरवाढ प्रस्तावित |
| ३ | झोपडपट्टीधारक (लफाटा किंवा पत्र्याचे किंवा मातीचे झोपडे) | रु. ६० प्रतिमहा रु. ७२० प्रतिवर्ष | १५,२९३ x ७२० = १,१०,१०,९६०/— ———————— एकुण रु. ९४,९७,०९,९६०/— | रु. १२० प्रतिमहा रु. १४४० प्रतिवर्ष | २,२०,२१,९२० ———————— एकुण रु. २९,९४,१९,९२० | १,१०,१०,९६० ----------- एकुण १४,९७,०९,९६० | दरवाढ प्रस्तावित |

सदर वाढ मान्य केल्यास महापालिकेस रु. ३३.८७ कोटी अतिरिक्त उत्पन्न मिळेल. तरी देखील शासनाच्या सुचनानुसार पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण होवू शकणार नाही व्यापारी मिळकतींवर करयोग्य मुल्याच्या टक्केवारीने पाणी पट्टी व पाणी पुरवठा लाभकर आकारणे प्रस्तावित असून त्याचा समावेश मालमत्ता कर प्रस्तावात करण्यात आला आहे. जे नळ जोडणी धारक मिटरद्वारे मोजणी करून पाणी पुरविण्याची मागणी करतील, अशा निवासी / अनिवासी नळजोडणीसाठी पुढील प्रमाणे दर प्रस्तावीत करण्यात येत आहे .

| अ क्र | वापराचा प्रकार | दर प्रति १००० लिटर |
|---|---|---|

| | | प्रचलित दर (रूपये) | प्रस्तावित दर (रूपये) |
|---|---|---|---|
| १ | निवासी | १२/— | १५/— |
| २ | अनिवासी अ) वाणिज्य | २६/— | ३०/— |
| | ब) औद्योगिक | २६/— | ३०/— |
| | क) सार्वजनिक संस्था | १५/— | २०/— |

अ) मिटर चालू स्थितीत प्रति महा किमान आकारणी

| | | वाणिज्य | | घरगुती | | विशेष | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ क्र | व्यास (मी.मी.) | प्रचलित दर | प्रस्तावित दर | प्रचलित दर | प्रस्तावित दर | प्रचलित दर | प्रस्तावित दर |
| १ | १५ | ४६८ | ५४० | १६२ | २०३ | २०३ | २७१ |
| २ | २० | ८६१ | ९९४ | ३०० | ३७५ | ३७५ | ५०० |
| ३ | २५ | १२४८ | १४४० | ४३२ | ५४० | ५४० | ७२० |
| ४ | ३२ | १८७२ | २१६० | ६४८ | ८१० | ८१० | १०८० |
| ५ | ४० | ३२७६ | ३७८० | ११४० | १४२५ | १४२५ | १९०० |
| ६ | ५० | ४१७३ | ४७७४ | १४४० | १८०० | १८०० | २४०० |
| ७ | ६५ | ५०७३ | ५८५४ | १८०० | २२५० | २१९० | २९२० |

ब) मिटर नादुरूस्त स्थितीत किमान आकारणी—

| | | वाणिज्य | | घरगुती | | विशेष | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | व्यास (मी.मी.) | प्रचलित दर | प्रस्तावित दर | प्रचलित दर | प्रस्तावित दर | प्रचलित दर | प्रस्तावित दर |
| १ | १५ | ७०२ | ८१० | २१६ | २७० | ३१५ | ४२० |
| २ | २० | १३०० | १५०० | ३६० | ४५० | ५७८ | ७७१ |
| ३ | २५ | १८७२ | २१६० | ५७६ | ७२० | ८४० | ११२० |
| ४ | ३२ | ३३८० | ३९०० | १०४४ | १३०५ | १५३० | २०४० |
| ५ | ४० | ४९४० | ५७०० | १५१२ | १८९० | २२४० | २९८७ |
| ६ | ५० | ६०५८ | ६९९० | २१६० | २७०० | २४७५ | ३३०० |
| ७ | ६५ | ६७६० | ७८०० | २३४० | २९२५ | ३०४८ | ४०६४ |

स्पष्टीकरण:

अ) वाणिज्य वापर :— यामध्ये सर्व प्रकारची दुकाने, गोडाऊन, वेअर हाऊस, पेट्रोल पंप, सॉ मिल, ट्रान्सपोर्ट ऑफिस, रूग्णालये, दवाखाने, उपहार गृहे, विश्रामगृहे, परमिट रूम, बिअर बार, सिनेमागृहे, मंगल कार्यालये, तबेले, जलतरण तलाव, केस कर्तानालये, गॅरेजेस (धुण्याची सुविधा नसलेले), यंत्रमाग (पॉवर लुम्स) व ज्या उद्योगांमध्ये प्रक्रिया करण्यासाठी प्रत्यक्षात पाण्याचा वापर करण्यात येत नाही असे उद्योग व धंदे, इमारतीचे बांधकामासाठी वापरण्यात येणारे पाणी इत्यादींचा समावेश असेल.

ब) औद्योगिक वापर:— ज्या उद्योगामध्ये प्रक्रिया करण्यासाठी प्रामुख्याने पाण्याचा वापर होतो असे सर्व उद्योग, केमिकल कंपन्या, सर्विस स्टेशन्स, सर्विस स्टेशनसह वाहन दुरूस्ती केंद्र (गॅरेज), बर्फ कारखाने, टाईल्स व मार्बल कारखाने लॉंड्रीज, धोबीघाट (कपडे धुण्याचे ठिकाण), विट—भट्टया, नर्सरी, इत्यादींचा समावेश असेल.

क) सार्वजनिक संस्था:— यामध्ये नोंदणीकृत शाळा महाविद्यालये, धर्म शाळा, धर्मादाय संस्था चालवित असलेले रूग्णालये इत्यादींचा समावेश असेल. नळजोडणीचे मीटर नादुरूस्त असल्यास किंवा बंद असल्यास मिटर असलेल्या लगतच्या तीन महिन्यातील पाण्याचा सरासरी वापर लक्षात घेवून वरील प्रमाणे आकारणी करण्यात येईल.

सध्यस्थितीत वाणिज्य वापर होत असलेल्या जागांसाठी ज्यामध्ये नळ जोडणी आहे अशा मिळकत धारकांना वरील प्रमाणे आकारणी करण्यांत येते अशा मिळकत धारकांना अंदाजित ४ एम.एल.डी.प्रति दिवस पाणी पुरवठा होत आहे. त्यामुळे उपरोक्त दर मान्य केल्यासरु. रु. २३ लाख उत्पन्नांत वाढ होण्याची शक्यता आहे व मीटरव्दारे होणा—या पाणी पुरवठा सेवा पासुन अंदाजे एकुण रु. ३. २० कोटी एवढे उत्पन्न मिळेल.

तरी उपरोक्त १ व २ प्रमाणे पाणी पुरवठा दरवाढ मान्य केल्यास पाणी पुरवठा सेवे पासुन वार्षिक मागणी अंदाजे रु. ५१.०६ कोटी अपेक्षित होईल. तरी देखील पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण होऊ शकणार नाही. कारण एवढी रक्कम प्रति वर्ष एम. आय. डी. सी. ला पाणी खरेदी पोटी अदा करावी लागते. त्या व्यतिरिक्त पाणी पुरवठा विभागात कार्यरत कर्मचारी वर्गाचे वेतन व भत्ते, पाणी पुरवठा वितरण व्यवस्था, कुपनलिका इत्यादी या सर्व बाबीवर होणारा खर्च अंदाजे रु. ५ कोटी महापालिकेच्या इतर स्त्रोतातुन सोसावा लागतो.

पाणी पट्टी दराबरोबरच नळजोडणी अनामत, नळजोडणी फी,खोदलेला खडड्ा व रस्ता पुर्ववत करण्यासाठी येणा—या खर्चाची वसुली करण्यासाठी दर निश्चित करणे आवश्यक आहे.

नवीन नळ जोडणी करणे किंवा खंडीत करण्यात आलेल्या नळ जोडणीची पुर्नजोडणी करणे यासाठी खालील प्रमाणे शुल्क आकारण्यात यावे असे प्रस्तावित आहे.

| अ क्र. | आकार (मी.मी.) | नवीन नळ जोडणी | | नळसंयोजकांची जोडणी व तोडणी | | खडड्ा खोदणे | | रस्ता खोदाई खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रचलीत | प्रस्तावीत | प्रचलीत | प्रस्तावीत | प्रचलीत | प्रस्तावीत | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५ | १०० | २०० | १०० | २०० | १००० | २००० | अ) प्रति मिटर रू ३५०/— कच्च्या रस्त्यासाठी ब) प्रति मिटर रू ७००/— डांबरी रस्त्यांसाठी क) प्रतिमिटर रू १५००/— कॉंक्रिट रस्त्यांसाठी |
| २ | २० | १५० | ३०० | १५० | ३०० | १००० | २००० | |
| ३ | २५ | २०० | ४०० | २०० | ४०० | १००० | २००० | |
| ४ | ४० | ३०० | ६०० | ३०० | ६०० | १००० | २००० | |
| ५ | ५० | ५० मी.मी.किंवा त्यापेक्षा जास्त प्रत्येक संयोजकाच्या स्थितीनुसार अंदाजित केल्या प्रमाणे रू ५०० | | | | १००० | २००० | |

नळ जोडणी अनामत रक्कम :—

| अ. क्र | आकार | घरगुती वापरासाठी दर | | बिगर घरगुती वापरासाठी दर | | सार्वजनिक संस्था व सरकारी संस्था दर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रचलीत | प्रस्तावीत | प्रचलीत | प्रस्तावीत | प्रचलीत | प्रस्तावीत |
| १ | १५ मि.मि. | १००० | २००० | ४००० | ८००० | २००० | ४००० |
| २ | २० मि.मि. | १८०० | ३६०० | ६००० | १२००० | ३६०० | ७२०० |
| ३ | २५ मि.मि. | ३००० | ६००० | १०००० | २०००० | ५२०० | १०४०० |
| ४ | ४० मि.मि. | ७५०० | १५००० | २०००० | ४०००० | १२००० | २४००० |
| ५ | ५० मि.मि.व त्यापेक्षा जास्त | ९००० | १८००० | ३०००० | ६०००० | १६००० | ३२००० |
| | | प्रत्येक जलवाहिनीच्या वाहनधारक क्षमतेच्या तीन किंवा त्यापेक्षा जास्त महिन्याच्या देयकावर आधारित | | | | | |

मीटर तपासणी फी :—

| अ. क्र. | नळ जाडणीचा आकार | तपासणी फी | | संयोजकावरुन मीटर काढण्याचे शुल्क | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रचलीत (रूपये) | प्रस्तावीत (रूपये) | प्रचलीत (रूपये) | प्रस्तावीत (रूपये) |
| १ | १५ मि.मि. | १०० | २०० | १०० | २०० |
| २ | २० मि.मि. | १५० | ३०० | १५० | ३०० |
| ३ | २५ मि.मि. | २०० | ४०० | २०० | ४०० |
| ४ | ४० मि.मि. | ३०० | ६०० | ३०० | ६०० |
| ५ | ५० मि.मि. | ५०० | १००० | ५०० | १००० |
| ६ | ८० मि.मि. | ५०० | १००० | ५०० | १००० |
| ७ | १०० मि.मि. ते ३०० मि.मि पर्यत | | १५०० | | १५०० |

इतर फी :—

| अ. क्र. | नळ जाडणीचा आकार | तपासणी फी | |
|---|---|---|---|
| | | प्रचलीत (रूपये) | प्रस्तावीत (रूपये) |
| १ | NOC No Dues Certificate | २० | १०० |
| २ | Duplicate Water BiIls | १० | २५ |
| ३ | Plumbing licence I) New Plumbing licence | ५००० | १०००० |
| | ii) Annual Renewal f ee | १००० | ५००० |
| | iii) Delayed Annual Renewal Penalaty | -- | 500 प्रति महा |
| ४ | Permission for drainage connection fee (excluding road cutting permission and charges) | 500 | 1000 |
| ५ | Regularisation of illegal water connection I )For Domestic Water connection II) For Non Domestic Water connection | | Equivalent to sanctioned Legal connection amount of relevant dia + penalty as Equal to security deposit =do = + water bill for the period from which water is consumed |

पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण होण्यासाठी शासन परिपत्रक क्रमांक D.O. No./PRE-१०३३/२२७७/PE.१, दिनांक २६ जुलै २००१ अन्वये सर्व महानगरपालिकेस देण्यात आलेल्या सुचनेनुसार सर्व नगरपालिका / महानगरपालिकेने पाणी पुरवठा सेवा "नफा ना तोटा" या तत्वावर पुरविणे आवश्यक आहे. अन्यथा महापालिकेस अनुज्ञेय असलेली अनुदाने बंद करण्यांत येतील असे सूचित केले आहे.

तसेच भारतीय लेखा तथा लेखा परिक्षण विभाग (सीएजी) महाराष्ट्र यांचे मार्फत वित्तीय वर्ष १९९७–९८ ते सन २००१–२००२ या कालावधीचे लेखा परिक्षण करतांना सदर लेखा परिक्षणात पाणी पुरवठा योजना " ना नफा ना तोटा" या तत्वावर न चालविता वर्षानुवर्षे मोठया प्रमाणावर तोटा सहन केल्याबाबत आक्षेप घेतले आहे. सदर आक्षेपांची गांभीर्यपुर्वक दखल घेणे आवश्यक आहे . वरील सर्व कराच्या दरात वाढ करणेचा प्रस्ताव मागील वित्तीय वर्ष सन २००८–२००९, २००९ –२०१० मध्ये सादर करण्यात आला होता. परंतु सदर प्रस्ताव महासभेने नामंजूर केल्यामूळे महापालिकेच्या आर्थिक स्थितीवर विपरित परिणाम होत आहे

सबब, वित्तीय वर्ष २००९–२०१० साठी

(१) मा. महासभेचा ठराव क्र. ३४ दि. १३/०७/२००७ अन्वये, जवाहरलाल नेहरु नागरी पुर्ननिर्माण अभियाना अंतर्गत सक्तीच्या सुधारणामधील उपभोक्ता शुक्ल व सेवांचे दर प्रत्यक्ष खर्चावर आधारीत ठरविणे आवश्यक असल्याने सध्या पाणी पुरवठयाचे दर त्या मधुन मिळणारी मिळकत बघता पाणी पुरवठा व्यवस्था स्वय:पुर्ण ( Self Supporting ) होण्या करीता पाण्याच्या दरात वाढ करणे अंत्यत गरजेचे आहे. यासाठी वरील ठरावानुसार मा. आयुक्त सो. यांना पाणी पुरवठा दरामध्ये आवश्यक तरतुदीनुसार सुधारणा करण्या करीता मा. आयुक्त सो. यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

(२) महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु नागरी पुर्ननिर्माण अभियान या योजनेत भाग घेतला असुन पाणी पुरवठा, मलनिस्सारण भुयारी गटार योजना, रस्ते विकास व ई–गव्हर्नन्स हे प्रकल्प राबविण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहेत. वरील पैकी पाणी पुरवठा योजनेसाठी रु. १२७.६५ कोटीच्या प्रकल्पास मंजुरी प्राप्त झाली आहे व उर्वरित प्रस्ताव विचाराधीन असुन त्यावरही निर्णय लवकरच होणेची अपेक्षा आहे. तोपर्यंत या सर्व योजना यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महापालिकेस स्वत:चा हिस्सा म्हणुन रक्कम उपलब्ध करावी लागेल व काही रक्कम कर्ज स्वरुपाने उभारावी लागेल. महानगरपालिकेने केंद्र शासन, राज्य शासन यांच्या दरम्यान करण्यात आलेल्या त्रिपक्षीय करारात महापालिकेने पाणी पुरवठा योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालविणेची हमी दिली आहे. सदर कराराची अमंलबजावणी न केल्यास महापालिकेस जे.एन.एन.आर.यु.एम. योजने अंतर्गत पुढील हप्ते प्राप्त होणार नाहीत व याचा परिणाम संपुर्ण योजनेवर होईल

सबब वित्तीय वर्ष सन २००९–१० साठी पाणी पट्टीचे दर निश्चित करणे बाबतचा प्रस्ताव मा. महासभेच्या मान्यतेसाठी पटलावर सादर करण्यात येत आहे.

<u>विशेष महासभा ठराव क्र. ५८ क</u> <u>दिनांक :–१९/१२/२००९</u>

**सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी**

**अनुमोदकाचे नाव :– श्री.बी.बी. मोरे**

ही महासभा वित्तीय वर्ष २००९-१० साठी पाणी पट्टीचे दर फेरनिश्चित करणेस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

कारण--

२००९-२०१० चा अर्थसंकल्प संपृष्टात येत असून नविन अर्थसंकल्प २०१०-२०११ तयार करण्याच्या वेळी सदरहु विषय विचारात घेता येईल.

सुचकांची सही/–

अनुमोदकांची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी

विशेष महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ३ :– उल्हासनगर शहरामधील इमारती कमकुवत झाल्यामुळे कोसळत असल्याने इमारतीस चार चटई क्षेत्र निर्देशांक मान्य करणे.

---

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :–</u>मा. महापौरजी, या प्रस्तावासाठी आम्ही आयुक्तांना प्राधिकृत करु इच्छितो. ज्यामध्ये झोनिंग, सामासिक अंतरामध्ये शिथीलता, उंची बाबत शिथीलता, फायर सेफ्टी या सर्व गोष्टी लक्षात घेवुन जो आमचा प्रस्ताव आहे तो शासनापुढे घेवुन जावु. शासनाची मंजुरी घेवुन त्यावर कार्यवाही करायची आहे.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>या सूचनेसह ठराव मंजुर केला जावा.

<u>श्री. सी.पी.सिंह (सहा. संचालक, नगररचना):–</u>मा. महापौर महोदया, मा. सदस्यानी आता जे मुद्दे उपस्थित केले आहे, त्याबाबत जेवढे काही आवश्यक मुद्दे असतील ते या विषयाच्या ठरावामध्ये समाविष्ट केले जातील यासाठी या विषयाच्या गोषवा–यात बदल करुन सुधारीत गोषवारा महासभेपुढे आणु.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :–</u>किती कालावधीत?

<u>श्री. सी.पी.सिंह (सहा. संचालक, नगररचना):–</u>पुढील महासभेत.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :–</u>हे पहा ही विशेष महासभा आहे, सध्या शहरात सर्वात मोठी जी समस्या आहे ती कोसळणा–या इमारतींची आहे. यासाठी या विषयाला प्राधान्य देवुन पुढील महासभेत हा प्रस्ताव आणावा. आता पुढील महासभा पुढील महिन्याच्या २० तारखेला होईल. यासाठी माझी आपणांस अशी विनंती आहे की, आपण कालमर्यादा निश्चीत करुन दयावी. किती दिवसांच्या कालावधीत आपण सुधारीत प्रस्ताव दयाल? आपला प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर चार दिवसाची सूचना देवुन विशेष महासभा बोलावता येईल जेणेकरुन हा मुद्दा निर्णय काढण्यासाठी लवकरात लवकर विशेष महासभा बोलावता येवु शकेल.

<u>श्री. सी.पी.सिंह (सहा. संचालक, नगररचना):–</u>मा. महापौर महोदया, पंधरा दिवसात आम्ही प्रस्ताव सादर करु.

<u>महापौर :–</u>हा विषय सुध्दा पुढे ढकलण्यासाठी प्रस्तावित करण्यात आला आहे. प्रशासनाकडुन निवेदन आले आहे की, या विषयाचा जो गोषवारा आहे त्यामध्ये काही कमतरता आहेत. त्यामध्ये आणखी काही मुद्दयांचा समावेश करायचा असल्याने या विषयाचा गोषवारा ते फेरसादर करतील. ठिक आहे?

सदरचा विषय वगळण्याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ३ :–** उल्हासनगर शहरामधील इमारती कमकुवत झाल्यामुळे कोसळत असल्याने इमारतीस चार चटई क्षेत्र निर्देशांक मान्य करणे.

<u>प्रस्तावना</u>

स्वातंत्र्यपूर्व काळात सन १९४२ मध्ये भारत सरकारने लष्करी सैनिकांच्या वसाहतीसाठी सुरक्षित व योग्य ठिकाण म्हणून उल्हासनगरची निवड करुन वसाहतीसाठी १३०० हेक्टर जमिन संपादित केली. सदर जमिनीचा विकास करुन त्यामध्ये १९७३ बॅरेक्स बांधून सुमारे ६००० सैनिकांना राहण्यासाठी देण्यात आले. सन १९४७ मध्ये हिंदुस्थानची फाळणी होऊन भारत व पाकिस्तान हे दोन राष्ट्रे निर्माण झाली. या फाळणीमध्ये सिंध प्रांतातुन निर्वासितांचे लोंढे भारतात येऊ लागले. त्या निर्वासितांचे पुर्नवसन १९७३ बॅरेक्सचाच संक्रमण छावण्या म्हणून उपयोग करुन सुमारे ९४४०० निर्वासितांची व्यवस्था उल्हासनगरमध्ये केली होती.

उल्हासनगर हे मुंबई महानगरापासून जवळ असल्यामुळे तसेच शहरातुन जाणारे महामार्ग व मध्य रेल्वेच्या मार्गावर विठठ्लवाडी व उल्हासनगर ही रेल्वे स्थानके मध्यवर्ती ठिकाणी असल्यामुळे तसेच दळणवळणास सोयीचे ठिकाण असुन लघुउदयोग व औद्योगिक विकास मोठया प्रमाणावर असल्यामुळे उद्योजक व मध्यमवर्गीयांचा लोंढा उल्हासनगराकडे वळला असल्यामुळे उल्हासनगर महानगरपालिका हद्दीमध्ये परवाना न घेता व भारतीय इमारत बांधणेबाबतची मानके यांचे योग्य ते निर्देश न पाळता बांधकाम करतेवेळेस इमारतीच्या मजबुतीकडे विकासकाने लक्ष न देता तसेच स्वत:कडे जमिनीचा मालकी हक्क नसल्यामुळे

घाईगडबडीने अनधिकृत बांधकामे करुन सदर इमारतीमध्ये रहिवास/वाणिज्य/औद्योगिक वापर करण्यात आला.

उल्हासनगर शहरामध्ये अनधिकृत बांधकामे मोठया प्रमाणामध्ये होऊन सन १९९१ ते १९९६ या कालावधीमध्ये रेतीचा तुटवडा असल्यामुळे माती मिश्रीत वाळू वापरुन तसेच स्वस्त दरामध्ये इमारतीचे साहित्य उपलब्ध झाल्याने अनेक इमारती बांधण्यात आल्या. परंतू अशा इमारतींचे आयुष्य कमी असल्यामुळे त्या इमारती धोकादायक होऊन कोसळण्याच्या मार्गावर आहेत. तथापि उल्हासनगर शहराच्या बांधकाम नियंत्रण नियमावलीमध्ये अशा धोकादायक इमारतींचे पुर्नबांधणी करताना चटई क्षेत्र निर्देशांक वाढवुन देण्याची तरतुद नसल्यामुळे अशा इमारतींना वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करता येत नाही.

उल्हासनगर शहरातील इमारतींपैकी तळमजला + ४ मजलेची वाणिज्य व रहिवासी वापरासाठीची इमारत बांधण्यात आलेली होती व त्यात तळमजल्यावर ३ दुकाने व १ ते ४ मजल्यावर १८ सदनिका होत्या. ती इमारत पूर्णपणे कोसळली. तद्नंतर सदर इमारतीचे दुप्पट चटई क्षेत्र निर्देशांकाने बांधकाम नकाशे मंजूरीस सादर केले होते. तथापि, अशा प्रकारचे प्रावधान मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत नाही. तथापि, सध्या सदर जागेवर १ चटई क्षेत्र निर्देशांकाप्रमाणे बांधकाम परवानगी मंजूर करण्यात आलेली आहे. चटई क्षेत्र निर्देशांक १ प्रमाणे पूर्वी रहात असलेले १८ सदनिकाधारक आणि ३ दुकानदार यांना ही जागा अपूरी पडत असल्यामुळे त्यांच्याकडून आणि महानगरपालिकेच्या नगरसेवकाकडून अशा धोकादायक इमारतींना चार चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्याची मागणी होत आहे

सदर धोकादायक असणाऱ्या इमारत पडल्यास पुर्न:बांधणी करतेवेळेस ४ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय केल्यास अस्तित्वातील असलेल्या जास्तीत जास्त सदनिकाधारकांना समावेश करुन घेणे सोईचे होईल. जेणेकरुन रहिवासी बेघर होणार नाहीत.

सदरहू बाब मा. सर्वसाधारण सभेसमोर ठेऊन कृपया मान्यता घ्यावी.

विशेष महासभा ठराव क्र. ५८ ड — दिनांक :—१९/१२/२००९

**सुचकाचे नाव :—श्री. दत्तात्रय पवार**

**अनुमोदकाचे नाव :— श्री. रविंद्र बागुल**

ही महासभा उल्हासनगर शहरामधील इमारती कमकुवत झाल्यामुळे कोसळत असल्याने इमारतीस चार चटई क्षेत्र निर्देशांक मान्य करण्याबाबतचा प्रस्ताव सविस्तर माहिती अभावी वगळण्यास मान्यता देत आहे.

**कारण**——

सदरहु प्रस्ताव फेरसादर करण्याची मागणी प्रशासनाने केली आहे.

सुचकांची सही/-
अनुमोदकांची सही/—

सर्वानुमते

महापौर/पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— पहिली सभा समाप्त. दुसरी महासभा सुरु होत आहे.

दुपारी १२. ४५ वाजता महापौर श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी यांनी पहिली सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका